# स्वकुळ समाचार

वर्ष - ३६ अंक - ४ ठाणे जुलै २०२४ पाने - ३६ स्वागत मुल्य रु. २५/-





















www.swakulsamachar.com

# अमृत महोत्सव सोहळ्याच्या हार्दिक शुभेच्छा !

## मा. श्री. शिवाजीराव सदाशिव आमते, बदलापूर यांचा ७५वा वाढदिवस



श्री. शिवाजीराव आमते यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त तुला करताना



श्री. शिवाजीराव आमते कुटुंबासोबत



श्री. शिवाजीराव आमते यांचे संपूर्ण कुटुंब व ठाणे जिल्हा पदाधिकारी



शिवभक्त अनुदानित आदिवासी आश्रम शाळा लव्हाळी या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना क्षणचित्रे

**श्री. शिवाजीराव आमते यांना ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचारतर्फे वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा**

| | |
|---|---|
| कै. नेमिचंद सोनू साळी व कै. यमुनाबाई नेमिचंद साळी यांच्या स्मरणार्थ श्री. भालचंद्र ने. साळी व श्री. संजय ने. साळी (डोंबिवली) यांच्या सौजन्याने पृष्ठदान. २ | कै. सौ. शुभलक्ष्मी नारायणराव कांबळे यांच्या स्मरणार्थ ठाणे येथील श्री. अमित नारायणराव कांबळे यांच्या सौजन्याने पृष्ठदान. |

**अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त**
**अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त**
**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित**
**नोंदणी क्र. ई/९२८/ठाणे दि. १७/५/८८**

# स्वकुळ समाचार

RNI No. MAHMAR/2014/57230
कार्यालय : फ्लॅट नं. ०१, साईसेवा नं. २ को.ऑप.हौ.सोसा., जन.
अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१.



**अध्यक्ष :** **श्री. शिवाजीराव सदाशिव आमते**-मो.९०९६४०३८००
मातृपितृ छाया, समर्थ नगर (शिरगाव), समर्थ विद्यालय रोड,
पोस्ट कुळगाव बदलापूर (पूर्व), ता. अंबरनाथ,
जि. ठाणे - ४२१ ५०३.

**सचिव : श्री. राजेश शंकरराव साळी, ९९६७५८४०३२**
**सहसचिव : सौ. शैलजा सो. कासटकर ९८२०१४५४५१**
**उपाध्यक्ष : श्री. श्याम लाहोरकर, ७४९९८८५४८३**
**कोषाध्यक्ष : श्री. ईश्वरलाल एकनाथ फंड, ८६५२२१५१६३**
**अंतर्गत हिशोब तपासणीस :** बारसु सिताफळे, ९३२६१८२४३५
**आर्थिक सल्लागार :** श्री. नितीन ढवण (सीए) ९८२२४५६७६६
**सल्लागार :** श्री. भालचंद्र नेमिचंद साळी, ९७०२६४४२३२
श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर ९८२०८२१७२६
डॉ. किसनराव जगन्नाथ जेधे ९८३३८२०६०१
श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव ९७५७०८६९१५

**संपादक : श्री. गोपाळ सुकलाल थोरात** मो.: ७७०९३१५४९८
घरकुल हौ. सोसा., रुम नं. ५१७७, मारुती मंदिराजवळ,
शिवाजी नगर, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१
**सहसंपादक :** श्री. अविनात शंकर धोत्रे, ९५०३३१२५६६
**सहसंपादक :** श्री. रमेश विष्णुदास बारगजे, ९८६९४८३६००
**सदस्य :** श्री. पुरुषोत्तम जगन्नाथ साळी मो. ८४२१९१०४३७
श्री. शशिकांत डहाके, ९८९२०२३७६३
**तांत्रिक समिती :** श्री. उदयकुमार साळी, ९३२३३८६१३९
(DCE, B. Tech, Civil)
तांत्रिक सल्लागार, सामान्य प्रशासन, ठाणे जिल्हा
**वेब डिझायनर :** श्री. बाळकृष्ण साळी, सुरत ९०३३६०३६१३
**सदस्य :** श्री. राजेश जगन्नाथ साळी, ९२०९२०३६९६
श्री. पंकज अरुण दिवटे, ९८२०८८२२८९
**कायदेशीर सल्लागार :** ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे
बी.कॉम.,एल.एल.बी.,जी.डी.सी. ॲण्ड ए
मो.: ९८३३५२७१२२


**या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक सहमत असतातच असे नाही ... .... संपादक**


**पत्रव्यवहार व लेखन साहित्य पाठविण्यासाठी :-**
E-mail : sampadakswakulsamachar@gmail.com
Website : www.swakulsamachar.com


**अधिकृत प्रतिनिधी**

१) श्री. संजय सुरेश खोपे, खोपोली ९५६१८१९१९३
२) श्री. अशोक शिवदास साळी, सुरत ९९०९६०१९७०
३) श्री. प्रविण जी. ढवण, विंचूर ९८८१५८२७२९
४) श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल ९४२३३४३८३०
५) श्री. बाळकृष्ण मारुतीराव डमरे, बडोदा ९४२६०२५११४
६) श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण ९०२१५६४०२८
७) श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर ८७७९१७२९८६
८) श्री. विलास बाबुराव सरोदे, औरंगाबाद ९४२१४३१७३३

**नविन अधिकृत प्रतिनिधींच्या नियुक्ती साठी अर्ज मागविण्यात येत आहे.** - १) प्रतिनिधीचे वय २१ ते ७० या दरम्यान असावे. तसेच ते स्थानिक संस्थेचे सभासद असावेत. २) स्वकुळ समाचारसाठी जास्त वेळ देणारे तसेच नविन सभासद, जाहिरात, देणगी, इमारतनिधी आणि आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृतांन्त तात्काळ देणारे असावेत. ३) संस्थेबद्दल आस्था असणारे सुशिक्षित व संस्थेसाठी तन, मन, धन अर्पण करणारे असावेत.


**जाहिरातीचे दर** - रंगीत पूर्ण पान रु. ५०००/- साधे पूर्ण पान रु. १२००/- साधे पावपान रु. ३००/-
रंगीत अर्धेपान रु. ३०००/- साधे अर्धेपान रु. ६००/- शुभेच्छा रु. २५१/-
बातमीमधील एक कृष्ण धवल पासपोर्ट साईज फोटो प्रोसेसिंगकरीता रु. १००/- जाहिरातीसोबत पाठवावे. (फोटोची इमेज चांगली हवी.)

**साळी समाजातील सर्व सभासदांना नम्रविनंती आहे की आपण आपले सभासत्वाचे नुतनिकरण करुन घ्यावे ही नम्र विनंती.**

नविन दर खालीलप्रमाणे आहेत.

स्वकुळ समाचार

**१)नवीन सभासद वर्गणी**

१००० रु.(पाच वर्षाकरिता)
१५०० रु.(दहा वर्षाकरिता)
२००० रु.(पंधरा वर्षाकरिता)

**२) उपवर वधू नोंदणी वर्गणी**

| | |
|---|---|
| प्रत्येक अंकासाठी विना फोटो | **रु.७५/-** |
| बारा अंकासाठी विना फोटो. | **रु.७५०/-** |
| प्रत्येक अंकासाठी फोटोसह. | **रु.१५०/** |
| बारा अंकासाठी फोटो सह. | **रु.१५००/-** |
| **३) विश्वस्त निधी** | **रु.१५०१/-** |
| **४)आधारस्तंभ (स्मृतीपुष्प)** | **रु.१५०१/-** |
| **५)पृष्ठदान** | **रु.१५००१/-** |
| **६)मंगल निधी.** | **रु.५०१/-** |

वर दिलेले सर्व पेमेंट खालील अकाउंट नंबरला **NEFT/RTGS/IMPS/UPI तसेच QR CODE** ने पाठवू शकतात. पेमेंट पाठवल्याच्या स्क्रीन शॉट **8652215163** या व्हाट्सअप नंबरवर पाठविण्यास विसरू नये सोबत आपला फुल पोस्टल ॲड्रेस पिनकोड सह व मोबाईल नंबर पाठवावा म्हणजे आपणास आपली रिसिट आपल्या मोबाईलच्या व्हाट्सअपवर त्वरित पाठवण्यात येईल सहकार्य असावे

| | |
|---|---|
| **Favouring :** | **SWAKUL SAMACHAR** |
| **BANK NAME :** | **DOMBIVLI NAGARI SAHAKARI BANK** |
| **BRABCH :** | **NANDIVALI ROAD DOMBIVLI (EAST)** |
| **IFSC CODE :** | **DNSB0000009SB** |
| **ACCOUNT NUMBER :** | **009010100002199** |

**आपले विनीत**
**संपादक स्वकुळ समाचार**

**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्था**

**स्वकुळ समाचार मासिकासाठी**
**पेमेंट करणे आता एकदम सोपे झाले आहे,**
**आपण QR कोड वापरून पेमेंट करू शकता !!**

सभासद फी. जाहिरात देणगी, उपवर वधू नोंदणी, विश्वस्त निधी,
**त्याचा स्क्रीनशॉट ८६५२२१५१६३ श्री. ईश्वरलाल फंड**
**या क्रमांकावर न विसरता जरुर पाठवणे.**

**विनीत : स्वकुळ समाचार.**

**श्री. राजेश साळी - 9967584032**
**श्री. ईश्वरलाल फंड - 86522 15163**
**श्री. श्याम लाहोरकर - 7499885483**

कै. लिलाबाई मोरोपंत झिकरे(आई) कै. कांताबाई बाळासाहेब झिकरे यांच्या स्मरणार्थ श्री. बाळासाहेब मोरोपंत झिकरे, अहमदनगर, श्री. मधुकर मोरोपंत झिकरे, सौ. पद्माबाई मधुकर झिकरे, श्री. अनिल मधुकर झिकरे, सौ. त्रिवेणी अनिल झिकरे, बडोदा यांच्या सौजन्याने पृष्ठदान. ४

कै. श्री. तुकाराम रामचंद्र वखारे (वडील), कै. श्रीमती सुलोचनाबाई तुकाराम वखारे (आई) व कै. श्री. सुभाष तुकाराम वखारे (भाऊ) यांच्य स्मरणार्थ श्री. सुरेश तुकाराम वखारे (अहमदनगर) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# संपादकीय...

जय जिव्हेश्वर ,नमस्कार

पावसाळा सुरु झालाय, सगळीकडे चैतन्याचे वातावरण पसरले आहे. असाच पाऊस बरसात राहो, धरती मातेने हिरवी चादर ओढली आहे असा भास होत आहे. चोहीकडे हिरवळ दिसत आहे. शेतीची कामे चालू झालेली आहेत., शेतकरी बांधव पेरण्या करायच्या कामात गुंतलेला आहे. श्रावण चालू होताच सणांची मांदियाळी सुरु होईल. आपला देव भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव पुढील महिन्यात शनिवार दि १७ ऑगस्ट रोजी येत आहे. सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात साजरा केला जाईल यात शंका नाही.

त्याचप्रमाणे दहावी,बारावी,डिप्लोमा, डिग्री, CET, NEET परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झालेले आहेत, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्थेतर्फे अभिनंदन. विशेष कार्य केलेल्या व्यक्तींचे, वरिष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांनी ज्यांना ७० टक्के पेक्षा जास्त गुण आहेत त्यांनी आपल्या गुणपत्रिका आम्हाला पाठवाव्यात, पुढील कार्यक्रमात त्यांचा सत्कार केला जाईल.

त्याचप्रमाणे स्वकुळ साळी समाज संस्थेतील सर्व बांधवांना तसेच ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाच्या अंतर्गत सात संलग्न संस्था आहेत त्यांच्या अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी आपल्या विभागातील

समाजबांधवशी संपर्क साधावा व ज्या कोणी बांधवांच्या कुटुंबात वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस, नामकरण समारंभ,लग्न समारंभ, इतर कोणतेही समारंभ साजरे केले जातात त्याच्याप्रित्यर्थ ठाणे जिल्हा संस्थेला रुपये पाचशे, रुपये हजार या स्वरूपात देणगी पाठविण्यास प्रवृत्त करावे म्हणजे आपण केलेल्या मदतीतून आपली संस्था गरजवंतू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करता येईल ज्या सभासदांना कुणाला मासिक ई, मेल वर हवी असतील त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. मोबाईल ९९६७५८४०३२ संपादक

चुकभुल क्षमस्व.

***- संपादक टीम***

### नवीन सभासदांचे अभिनंदन

१) श्री.विजय भालचंद्र वावुळ, ठाकुर्ली (पूर्व)
०५ वर्ष पा.क्र.६७५/१०५३ ता.१७/०४/२०२४

२) श्री. अमित विजय कुराडे, ठाणे
०५ वर्ष पा.क्र.६७५/१०५६ ता.०४/०५२०२४

३) श्री. व्यंकटदास शास्त्री (सोलापूर,धोत्रे)
०५ वर्ष पा.क्र.६७५/१०६० ता.११/०५/२०२४

४) श्री. धनंजय हिरालाल वाव्हळ, इंदौर.
०५ वर्ष पा.क्र.६७५/१०६३ ता.३१/०५/२०२४

५) श्री. राजेश जगन्नाथ साळी(अंबरनाथ पूर्व)
०५ वर्ष पा.क्र.६७५/१०६४ ता.१२/०६/२०२४

६) सौ. वैशाली सुहास दातरंगे (नाशिक)
०५ वर्ष पा.क्र.६७५/१०६५ ता.१३/०६/२०२४

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आपण ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्थेकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे. तरी दरवर्षाप्रमाणे डिजिटल अथवा प्रत्यक्ष प्रमाणपत्राची खरी देण्यात येतील, चला तर, डिग्री,डिप्लोमा, दहावी,बारावी, राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावरील विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थी या सर्वांनी आम्हाला आपले गुणपत्रक,पुर्ण नाव ,पत्ता, मोबाईल नं, तसेच इ-मेल ॲड्रेस आम्हाला खाली दिलेल्या इ-मेल वर ३१ जुलै पर्यंत पाठवावेत.

sampadakswakulsamachar@gmail.com

संपर्क : श्री.राजेश साळी.९९६७५८४०३२
श्री. ईश्वरलाल फंड: ८६५२२१५१६३
श्री शिवाजीराव आमते : ९०९६४०३८००

# केळीच्या पानांत का जेवायचं? काय आहेत याचे फायदे? वाचा.....

केळीच्या पानावर जेवण केल्यावर अन्नाची चव चांगली लागते. अन्नाला हलकी पानाची चव, हलकी मातीची चव असली की अन्न चविष्ट लागतं. केळीच्या पानावर जेवण करण्याचं हे सुद्धा एक कारण आहे.

आपण बाहेर जेवायला गेलो, पंगतीत जेवत असलो की प्लास्टिक, थर्माकॉल अशा प्रकारच्या प्लेट्स मध्ये आपण जेवत असतो. या प्रकारच्या डिश विषारी असतात. आपण ज्या भांड्यात खातो त्याचे कण अन्नात मिक्स होतात हे कण जर हानिकारक रसायने असतील तर ते आरोग्यासाठी धोकादायक आहेत. त्या ऐवजी केळीच्या पानांत खाल्लं की अशा प्रकारचा धोका उद्भवत नाही. कॅन्सरचा धोका टळतो.

केळीच्या पानावर अन्न खाल्ल्याने पचनक्रिया चांगली होते. केळीच्या पानांत पॉलिफेनॉल असतं हे पचनासाठी चांगले असते. पोटाचे आरोग्य, पचनक्रिया सुरळीत ठेवायचं असेल तर केळीच्या पानांत जेवण करा.

केळीचे पान जिवाणू नष्ट करण्यास मदत करतात. केळीच्या पानांमध्ये नैसर्गिक अँटीमाइक्रोबियल गुणधर्म असतात. जर एखाद्या पदार्थामुळे आपल्याला आजार होणार असेल तर तशी शक्यता कमी होते.

डिस्पोजेबल प्लेट्सला नैसर्गिक पर्याय म्हणून केळीच्या पानांचा वापर करणे हा पर्यावरणपूरक पर्याय आहे. प्लास्टिक आणि फोम जमिनीच्या प्रदूषणास कारणीभूत आहेत. केळीची पाने जर जेवणासाठी वापरली गेली तर प्लास्टिक किंवा फोम प्लेट्सची गरज कमी होते आणि प्रदूषण वाढते.

*कुमार चोप्रा,*
*सुनील इनामदार, संग्रहक*

**दानासाठी आवाहन**

सर्वात श्रेष्ठ दान हे अवयव दान आहेच पण रक्तदान-अन्नदान-संपत्तीदान-वस्त्रदान-जलदान असे अनेक दानांपैकी अडल्यानडल्याला जर त्यांच्या अत्यावश्यक गरजे नुसार दान केले तर बाकी काही नाही पण आत्मिकशांती मिळुन खरं समाधान मिळाल्याचे समाधान मिळु शकते. पण खरे दान तेच की जे केल्यानंतर 'ह्या हाताचे त्या हाताला कळता कामा नये'. पण समोरच्याचे दुःख खुप मोठं आहे त्याला खुप मोठी गरज असताना फक्त नावलौकिक व्हावा ह्या आत्मप्रौढांसाठी तुटपुंजी मदत करून स्वतःहाचा फुकटचा नावलौकिक करून घ्यायचा. हे पूर्वापार होत आलेले आहे आणि हे असेच ह्या पुढे होत रहाणार आहे. म्हणुन ज्यांना शक्य आहे त्यांनी गरजूंना,आपल्याला शक्य आहे तेवढी मदत करावी किंवा हे जर शक्य नसेल तर त्यांना शाब्दिक आधार देणे हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य आहे.' नावलौकिकासाठी नव्हे तर प्रेरणा घेऊन एक पाऊल पुढे टाकावे म्हणुन मी आम्ही आयोजीत केलेल्या समारंभामध्ये नामांकीत प्रतिष्ठीत व जमलेल्या खुप मोठ्या समाजासमोर मी (भरत मते) माझे सर्व अवयव गरजुंना के.ई.एम. हॉस्पिटल मध्ये मरणोत्तर दान केलेले आहेत' ज्यांना शक्य आहे त्यांनी नक्कीच करा. मी स्वतःहाचे कौतुक म्हणुन नव्हे तर एक प्रेरणा घ्यावी म्हणुन उदाहरण दिले आहे.

भगवान श्रीं जिव्हेश्वर ,श्रीं स्वामी समर्थ

सदैव आपलेच श्रीं व सौ. अश्विनी भरत मते-९९६७१३९७८०






# आळंदी स्वकुळ साळी ज्ञातीगृहाचा वर्धापन दिन उत्साहाने साजरा

**आळंदी, पुणे -** (विलास सरोदे याज कडून) आळंदी येथील स्वकुळ साळी ज्ञातीगृहाचा १९ वा. वर्धापन दिन मंगळवार दिनांक १४ मे २०२४ रोजी आनंदाने व जोशपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्यमंत्री महोदयांचे स्वीय सहायक श्री. अविनाश साळी, अखिल महाराष्ट्र स्वकुळसाळी समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक विनायक दांडेकर, पुणे येथील श्री. जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा जिव्हेश्वर समाचारचे मुख्य संपादक डॉ. चंद्रशेखर बारगजे हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री क्षेत्र आळंदी ज्ञातीगृहाचे अध्यक्ष लायन चंद्रकांत आत्माराम हावरे हे होते.

प्रारंभी सकाळी सात वाजता ज्ञानेश्वर माऊली मंदिरात माऊलींच्या समाधीची महापूजा श्री. अविनाश साळी, माजी अध्यक्ष डी.जी. निमकर, विश्वस्त दीपक मारवाडी, जिव्हेश्वर प्रतिष्ठाचे विश्वस्त व जिव्हेश्वर समाचारचे सहसंपादक श्री. विलास सरोदे.. आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ दीप प्रज्वलन करून झाला. यानंतर सामूहिक आरती करण्यात आली. यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चिपळूण पेठमाप येथील भगवान जिव्हेश्वर संगीत भजनी मंडळाच्या प्रमुख श्रीमती शर्मिला मनोज सागावकर आणि त्यांच्या सर्व टीमने उत्कृष्टरित्या भजन सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

आपल्या प्रास्ताविकातून अध्यक्ष श्री. हावरे यांनी स्वकुळ साळी ज्ञातीगृहाच्या आज पर्यंतच्या विकासाचा तपशीलवार आढावा सादर केला. अजूनही ज्ञातिगृहाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाच्या योजना पैशा अभावी प्रलंबित आहेत. या सर्व योजना पूर्ण करण्यासाठी सर्व समाज बांधवांनी सढळ हस्ते आर्थिक मदत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी सर्वांना केले.

प्रारंभी सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भगवान श्री जिव्हेश्वर, माता अंकीनी आणि दशांकीनी यांचा पंचामृत महाअभिषेक करण्यात आला. गेल्या वर्षापासून वर्धापन दिना बरोबरच कृतज्ञता दिनही साजरा केला जात असतो. ज्ञातीगृहाला ज्यांनी ज्यांनी आर्थिक व वस्तुरूपाने सहकार्य केले त्या सर्वांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी पुणे येथील कै. डॉ. नरेंद्र मलकाजी चिल्लाळ व पुणे येथील कै. निवृत्ती पावले त्यांच्या नातेवाईकांमार्फत मरणोत्तर सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

स्वकुळ साळी ज्ञातीगृहाला दैनंदिन कारभारात तन, मन आणि धनाने कार्य करणारे पुणे येथील राजेश मर्ढेकर, चिपळूण येथील श्री. विजय वैद्य व कल्याण येथील श्री. उमेश वाव्हळ यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

**ग्रंथालय नामकरण विधी समारंभ.**

स्वकुळसाळी ज्ञातीगृहात असलेले सुसज्ज ग्रंथालयास वै. ह .भ. प. नागनाथ अण्णाजी बारगजे गुरुजी ग्रंथालय असे नामकरण करण्यात आले.

जिव्हेश्वर समाचारचे मुख्य संपादक डॉ.चंद्रशेखर बारगजे यांनी आपल्या वडिलांचे चांगले ग्रंथालय निर्मितीचे स्वप्न पूर्ण केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यासाठी डॉ. चंद्रशेखर बारगजे यांनी एक लाख रुपये रुपयाची देणगी दिली आहे.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार-**

इयत्ता दहावी परीक्षेत भक्ती मनीष मेन अकोले, सार्थ

गणेश सरोदे ठाणे, शौर्य संदीप पाटील रायगड, बारावी परीक्षेत आश्लेषा मिलिंद मुदगल रायगड, चंद्रिका राजकुमार ढगे सोलापूर, वैष्णवी श्याम गदगे सोलापूर, पदविका परीक्षेत श्रुती अनिल दळवी सोलापूर, आरती बलभीम कांबळे सोलापूर, शुभम यशवंत एकबोटे सोलापूर, पदवी परीक्षेत अभिषेक शाम हुबळीकर सोलापूर, ऋषिकेश हरिचंद्र शिपुरकर रायगड, मानसी सुधीर उपरे सोलापूर, पदव्युत्तर पदवी परीक्षेत डॉ. अश्विनी अमेय दांडेकर , सचिन मोहन काजळे, ढाणके श्याम दत्तात्रेय, यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

विविध परीक्षेत डॉक्टरेट मिळविलेल्या (पीएचडी) डॉ.प्रतीक्षा प्रसाद बोर्डे, डॉ. संध्या शिरीषचंद्र वैद्य, डॉ.उमाकांत बळीरामजी मेन, अनुराधा मोहन काजळे, आदींचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेत तितिक्षा सन्मान कंकाळ यांचाही सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**अमृत महोत्सवी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार.**

समाजातील ७५ वर्ष पूर्ण केलेल्या अथवा त्यावरील व्यक्तींचा संस्थेच्या वतीने सन्मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. गौरव करण्यात आलेल्या ज्येष्ठ समाज बांधवांची नावे पुढीलप्रमाणे आहे.

सुधाकर गजानन धारणकर, मालती सुधाकर धारणकर, अशोक त्रिंबकराव एलगट, श्रीमती कमलाबाई पिराजी राऊत, श्रीमती कांताबाई मच्छिंद्रनाथ सोनटक्के, सुनंदा रंगनाथ गायकवाड, जगन्नाथ नागनाथ बारगजे, श्रीमती वेणूताई बाळकृष्ण बुरसे, पुरुषोत्तम बाळासाहेब बाबुराव ढोरजे, बजरंग विष्णुपंत आकडे यांचा गौरव करण्यात आला.

**एक लाख रुपये देणगी देणाऱ्यांची नावे :**

ज्ञातीगृहाचा विकास करण्यासाठी श्री. अभिजीत जयंत साळी, श्री. महेश सदानंद दुर्गुळे, सौ. अंजली जगदीश वखारे, डॉ. चंद्रशेखर नागनाथ बारगजे. या समाज बांधवांनी रुपये एक लाख रुपयाची देणगी दिलेली आहे. यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना दांडेकर म्हणाले की, विकसित समाज निर्माण करण्यासाठी लहानपणापासूनच चांगले शिक्षण मिळणे आवश्यक आहे. यासाठी राज्य पातळीवर आम्ही शिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन होण्यासाठी अनेक योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. या योजनेचा सर्व विद्यार्थ्यांनी फायदा करून घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचलन सचिव देवेन पुष्पलाल क्षीरसागर यांनी केले. शेवटी अध्यक्ष चंद्रकांत हावरे यांनी सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व श्री. उपाध्यक्ष अमित उगले, कोषाध्यक्ष मनोहर दिवाने, हिशेब तपासणीस उल्हास दांडेकर, जगन्नाथ एलगट, सेवानिवृत्त उपकुलसचिव श्री संजय एरंडे, जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अंबर ढगे,संकल्प फाउंडेशनचे प्रमुख प्रा. सुभाष आढाव, अक्षरधारा प्रिंटर्स असामा फाउंडेशनचे महादेव साळी, दीपक मारवाडी, अशोक साळी, स्वाती ताटे, अशोक ढोरजे, दिलीप ढोरजे, दिलीप जाळींद्रे, नंदकिशोर ढोकळे, सौ.मंगल हरीश अष्टेकर, जयहरी साखरे, जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि जिव्हेश्वर समाचारचे सहसंपादक श्री.विलास सरोदे, ज्ञातीगृहाचे व्यवस्थापक राजेश त्रिमले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

***- विलास बाबुराव सरोदे-***



## बिनाखर्चाची पाईपलाईन असते.

१) एक कडूनिंबाचे झाड, दहा हजार लिटर पाणी संपूर्ण पावसाळ्यात जमिनीत घेऊन जाऊ शकते. याचा अर्थ, आपल्या परिसरात किमान ३० झाडं निंब, चिंच, जांभुळ, आंबा, मोह, अर्जुन या वर्गातील नक्कीच असावीत. म्हणजे, मृत साठ्याचे पाणी पाझरत रहाते.

२) एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाड, एका हंगामात एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते आणि तेही पन्नास फुटाच्या ही खाली. वडाची व पिंपळाचे मुळे पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोहोचतात..

३) एक कोटी लिटर म्हणजे एका सर्वसाधारण घरगुती विहीरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी. ज्याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.

४) म्हणून आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा महावृक्ष लावा.

५) आपण एका बोअरवेलसाठी एक लाख रु. खर्च करतो. एका विहीरीसाठी पाच लाख रु. खर्च करतो. पण पाण्याची कुठलीच शाश्वती नाही.

झाडाचे महत्व जाणाल, तर तुमचं महत्व वाढेल.

**झाडे लावा... निसर्ग वाचवा.**

## झाडे लावा झाडे जगवा

मानवाने आपल्या स्वार्थासाठी स्वतःहाच्या क्षणिक सुखासाठी झाडे-वेली-फुलांनी बहरलेली ही वसुंधरा अक्षरशः कसलाही विचार न करता कत्तलीवर कत्तल करत नष्ट करून सर्व ठिकाणी सिमेंटकॉंक्रीटची जंगलांच्या मागुन जंगले उभारून स्वतःहाच्या हाताने स्वतःहाचा विनाश ओढावून घेतला आहे. हळु-हळु मानवजातीची वाटचाल ह्या महाभयंकर विनाशामुळे कोठे चालली आहे? याचा अत्यंत गंभीर व प्रामाणीकपणे अत्यंत मुळाशी नव्हे तळाशी जाऊन विचार करण्याची वेळ आली आहे. वनराई नष्टझाल्यामुळे सर्व पृथ्वीतलावावरील वातावरण संपूर्णपणे बदलुन जाऊ लागले आहे आणि ही विनाशापूर्वीची मानवजातीला सावध करून आत्तापासून योग्य ती खबरदारी घेऊन पाऊले उचलावीत म्हणून ही पुर्व सुचना देणारी घंटा आहे. आता तरी जागे व्हा आणि ह्या धरतीमातेबरोबर आपल्यां वंशजांला-आपल्या पुढील पिढीला वाचवण्यासाठी झाडे लावा-झाडे जगवा आणि धोक्याच्या कड्यावर उभ्या असणाऱ्या ह्या आपल्या आई धरणीमातेला वाचवा. परिस्थिती खुप गंभीर आहे पण अजुनही हाताबाहेर गेलेली नाही म्हणुन लोकजागृतीचा वसा घेऊन जेथे जागा आहे तिथे-तिथे झाडे लावण्याचे व्रत घ्या.

भगवान श्रीं जिव्हेश्वर श्रीं स्वामी समर्थ

***- श्री व सौ.अश्विनी भरत मते.***

कै. सौ. सिंधुताई खंडु कापरे व कै. श्री. खंडु चिंतामणी कापरे यांच्या स्मरणार्थ श्री. महेश खंडु कापरे (कल्याण) व सौ. संगिता कापरे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.१०

कै. पांडुरंग महादेव काटकर यांच्या स्मरणार्थ श्री. किरण पांडुरंग काटकर, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान सन्माननिय हितचिंतक ४३

# ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्था अध्यक्ष श्री शिवाजीराव आमते यांचा ७५ वा वाढदिवस अमृत महोत्सव सोहळा

आज आमचे परिवारातील एकमेव उत्सव मूर्ती श्री. शिवाजी सदाशिव आमते यांचा जन्म दिनांक ०१/११/१९४९ रोजी बावधन या गावी झाला.पंच्याहत्तरीनिमित्त आज शनिवार दिनांक ११/०५/२०२४ रोजी या परिवारातील आनंद व्यक्त करणारा सोहळा म्हणजे 'श्री शिवाजी आमते यांचा ७५ वाढदिवस अमृत महोत्सव सोहळा.' या कार्यक्रमाचे आयोजन त्यांचे दोन्ही सुपुत्र श्री प्रमोद व श्री विकास त्याचप्रमाणे परिवारातील सर्व बंधू भगिनी या सर्वांच्या सहकार्याने करण्यात आला.



श्री. शिवाजी आमते यांच्या परिवारामध्ये त्यांना तीन बहिणी व चार भावंडे यामध्ये हे कनिष्ठ असून त्यांना हा अमृत महोत्सव सोहळा साजरा करण्याचे भाग्य मिळत आहे. त्यांच्या भगिनी अनुक्रमे चंद्रभागा,लक्ष्मीबाई व लीलावती तसेच बंधू अनुक्रमे दत्तात्रय, नथ्थुराम, शंकर व सुदाम अशी नावे आहेत.

आजाच्या या सोहळ्यानिमित्त श्री शिवाजी आमते यांचा वैयक्तिक कालक्रम व जीवनातील भाग्यदायी घटना यांच्या उहापोह पाहता घरातील सर्वांनी आपापल्यापरीने सहाय्य करून या कनिष्ठ बंधूस ज्येष्ठ स्थानी श्रेष्ठ ठरविले.

श्री शिवाजी सदाशिव आमते यांचा जन्म वाई तालुक्यातील बावधन या गावी झाला. त्यांचे पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद शाळा बावधन व आठवी ते अकरावी पर्यंतचे शिक्षण बावधन हायस्कूल बावधन येथे झाले.या विद्याप्राप्ती बरोबर उदरनिर्वाह करता त्यांनी सण १९६९ मध्ये नोकरीसाठी मुंबईस प्रयाण केले. त्यांचे थोर बंधू शंकरराव आमते यांच्या प्रयत्नाने त्यांना दिनांक २१/०२/१९७१ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडिया मध्ये चतुर्थ श्रेणी पदावर कायमस्वरूपी नोकरी मिळाली. शेवटच्या टप्प्यात असिस्टंट केअर टेकर या पदावर पाच वर्ष राहून वयाच्या साठाव्या वर्षी सरकारी नियमानुसार दिनांक ३०/१०/२००९ रोजी निवृत्त झाले. आज रोजी निवृत्तीचे १५ वे वर्ष सुरू आहे थोडक्यात या अमृत सोहळ्यास नोकरीच्या कालावधीचा आधार पूर्णत्वाने पात्र ठरला.

सन १९७७-७८ या काळात आण्णांनी स्वतःसह दोन बंधू व भगिनी यांना बदलापूर गावी आणले. आई-वडिलांच्या नातेसंबंधातील श्री दत्तात्रय हावरे यांच्याशी संपर्क साधून त्यांचे पुत्र नामदेव व सुभाष यांच्या मदतीने त्यांची बहीण मालन उर्फ सौ.प्रभावती तिच्याशी दिनांक २२/०५/१९७२ ला विवाह संपन्न झाला आजवरच्या वैभवात सौ.प्रभावती हिची मोलाची साथ ठरली. सन्माननिय ठाणे जिल्हा प्रभारी अध्यक्ष श्री. शिवाजीराव आमतो यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी शिवभक्त आदिवासी शाळेला यथाशक्ती शैक्षणिक वस्तुंची भेट देऊन एक आगळावेगळ्याप्रकारे त्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला.

या अमृत महोत्सवानिमित्त श्री. शिवाजी आमते आणि श्रीमती लक्ष्मी आमते यांना उदंड आयुष्य लाभो ही प्रभू चरणी प्रार्थना. या दुग्ध-शर्करा योगाचा सोहळा साजरा करण्यास आपण सर्व लहान थोर व पाहुणे मंडळ उपस्थित राहिला त्याबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार धन्यवाद. शतायुषी भव, शुभम भवतु.

*आपला नम्र,*

*श्री. कृष्णाजीपंत बाबुराव भागवत, कल्याण*

*मो.८९७६५५५९५३*

# ठाणे जिल्हा वासंतिक मेळावा

ठाणे जिल्हा व स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था डोंबिवली आयोजित वासंतिक मेळावा म्हणजे कलाकार मग त्यात नाच-गाणी, नकला, वक्तृत्व सगळ्यांनाच वाव मिळण्याची सुवर्णसंधी. ठाणे जिल्ह्यात असे बरेच छुपे कलाकार आहेत की त्यांना व्यावसायिक पातळीवरती संधी मिळत नाही परंतू आपली संस्था सर्वांना समान संधी देते जेणेकरून त्यांना त्यांचा आत्मविश्वास परत येण्यास संधी मिळते. सगळ्यांसाठी एक पर्वणीच असते. कलाकार आपले गीत इतक्या मधुर आवाजात सादर करत असतात की ही गाणी फक्त डोळे बंद करून ऐकावी अशी एकापेक्षा एक सरस गाणी सादर करत असतात अशीच एक संध्याकाळ मे महिन्याच्या १२ तारखेला रविवारी डोंबिवली येथे संधी चालून आली. डोंबिवली रेल्वे स्टेशन जवळील पूर्णिमा हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील आजी-माजी पदाधिकारी समाज बांधवांना कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले तसेच कलाकारांना नावे देण्यास कळविण्यात आले होते. श्री. ईश्वरलाल फंड यांचे घरी बसून दोन दिवस आधी कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. डॉ. किसनरावजी जेधे व सौ वैदही वखारे यांनी मोलाची मदत केली. प्रमुख पाहुणे शिवसेनेचे पदाधिकारी यांनाही निमंत्रण देण्यात आले होते हार, फुले, बुके, पूजेची तयारी, स्टेजची सजावट सर्व कामे वाटून देण्यात आली होती.संध्याकाळी ठीक सहा वाजता कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली सूत्रसंचालनाची जबाबदारी ठाणे जिल्हा







महिला अध्यक्षा सौ वैशाली कढेकर यांना देण्यात आली. स्टेजवर ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री शिवाजीराव आमते, डोंबिवलीचे अध्यक्ष श्री. भूषण कोळेकर व डॉ. श्री किसनराव जेधे यांना निमंत्रित करण्यात आले कुठलाही कार्यक्रमाची सुरुवात आपण गणेश वंदना करून करण्यात येते, कु. परीघा पंकज साळी हिने छान पैकी गणेश वंदना सादर केली.यानंतर श्री.शिवाजी आमते यांनी भगवान श्री जिव्हेश्वरांना पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन केले व यानंतर इतर पदाधिकाऱ्यांनी दीप प्रज्वलन करून जिव्हेश्वराची आरती म्हटली प्रमुख पाहुणे यांना यायला उशीर होणार होता म्हणून कलाकारांचा हिरमोड होऊ नये म्हणून मुख्य कार्यक्रमाला सुरू करण्यात आली.सर्वप्रथम श्री उदयकुमार साळी यांनी सुंदर गीत सादर केले. त्यानंतर एक एक दिग्गज कलारकारांनी गीतं सादर केलीत आणि सर्वांच्या टाळ्या मिळवल्या. युवा कलाकार कुमार सुजल दुर्गुळे यांनी कोकणातील सुप्रसिद्ध सुंदर दशावतार सादर केले नाटक अर्ध्यावर आले असतानाच प्रमुख पाहुण्यांचे आगमन झाले पण त्यांनी नाटक न थांबवता आम्ही पण याचा आस्वाद घेऊ असे म्हणाले त्यांच्या विनंतीला मान देऊन नाटक दशावतार चालू ठेवले नाटक संपल्यावर सगळ्यांनी टाळ्या वाजवून त्याचं अभिनंदन केलं. विशेष म्हणजे प्रमुख प्रमुख पाहुणे कल्याण डोंबिवली शहर संघटक श्री. दळवी साहेब, नगरसेवक, श्री. राजेश कदम व श्री. विश्वनाथ राणे शिवसेना शाखाप्रमुख यांना स्टेजवर बोलावून त्यांचा

कै. सौ. पार्वती शंकर वैद्य (आई), कै. श्री. शंकर नारायण वैद्य (वडिल) दाभोळ, कै. सौ. उषा रामदास वैद्य (नाशिक) यांच्या स्मरणार्थ श्री. रामदास शंकर वैद्य (नाशिक) व श्री. गजानन शंकर वैद्य, ठाणे यांच्या सौजन्याने पृष्ठदान. १२

सौ. महानंदा कमलाकर हर्णेकर, मुलुंड
यांच्या सौजन्याने पृष्ठदान सन्माननिय हितचिंतक

पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्याच्या सत्कार श्री. भूषण कोळेकर, डॉ. श्री. किसनराव जेधे यांनी केला सत्काराच्या उत्तरा दाखल प्रमुख पाहुणे यांनी विविध विषयाला हात घातला आगामी लोकसभा निवडणूक जवळच आहेत सर्वांनी आवर्जून मतदान करा अशी विनंती केली.डॉ.जेधे यांनी समाजासाठी एक हक्काची जागा मिळावी अशी विनंती केली संपूर्ण ठाणे जिल्हा आपल्या लाडक्या उमेदवाराच्या मागे ठामपणे उभा आहे प्रचंड मताधिक्याने निवडून येणारच अशी आश्वासन दिले. प्रमुख पाहुणे जनसमुदायाचा निर्धार पाहून भारावून गेले. त्यांना इतरही कार्यक्रमाला जायचे असल्याने सर्वांची रजा घेतली यानंतर कार्यक्रमाने पुन्हा भरारी घेतली. जुन्या नवीन गाण्यांनी ताल धरला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. ईश्वरलाल फंड, श्री. राजेश साळी, श्री. भुषण कोळेकर, श्री. स्नेहल एडके, श्री. डॉ. किसनराव जेधे, श्री. पंकज साळी, श्री. राजेश दातरंगे, श्री. अरुण एडके, सौ. वैदही वखारे, सौ. वैशाली कढेकर, श्रीमती रेखा दिवटे यांनी प्रचंड मेहनत घेतली त्यांचप्रमाणे प्रत्येक गायक व कलाकारांचा स्टेजवर बोलावून त्यांचा गुलाब पुष्प व पेन देऊन सत्कार करण्यात आला. श्री. उदयकुमार नाशिककर यांनी या कार्यक्रमासाठी करावके म्युझिक सिस्टीम उपलब्ध करुन दिली. विशेष सहकार्य म्हणून संस्था आपली खुपखुप आभारी आहे. तसेच या कार्यक्रमासाठी अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी संस्थेने सचिव श्री. भालचंद्रजी साळी हे आवर्जुन उपस्थित होते त्यांचीही संस्था खुप खुप आभारी आहे. डोंबिवली समाजाचे अध्यक्ष श्री. भूषण कोळेकर यांचा वाढदिवस होता या दिनाचे औचित्य साधून दोघा पती-पत्नीला स्टेजवर बोलावून केक कापून साजरा करण्यात आला.सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. वासंतिक मेळावा म्हणजे फक्त मनोरंजनाचा कार्यक्रम नसून कार्यकर्त्याचा मेळावा. जुने नवीन पदाधिकारी एकमेकास भेटतात. विचार विनिमय,गाठीभेटी होतात. विचारांना उजाळा मिळतो.कार्यक्रम खूप छान झाला, प्रतिक्रिया ही लगेच मिळाल्या.जेवणाची वेळ झाली सर्वांना जेवणासाठी विनंती करण्यात आली जेवणानंतर अध्यक्षांनी सर्वांना कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल आभार मानले व कार्यक्रमाच्या शेवटी पसायदान म्हणून कार्यक्रम संपल्याचे घोषित करण्यात आले.

## ।। भावपुर्ण श्रद्धांजली ।।







**स्व. जयलक्ष्मी त्र्यंबकराव माटोळे**

यांचे सोमवार दि.२७/०५/२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.
तरी त्यांच्या आत्म्यास चिर:शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना

***''चंदनापरी देह झिजवला, कष्टातुन वसंत बहरला,***
***नाही उरली साथ आम्हाला, आठवण येते क्षणोक्षणाला''***

पत्ता - परतूर, ता. परतुर, जि. जालना

**-: शोकाकुल :-**

**श्री. मनोज त्र्यंबकराव माटोळे** **सौ. संतोष त्र्यंबकराव माटोळे**
**माटोळे, पोटे, मेंद्रे परिवार**

## ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्थेतील संलग्न संस्था

१) स्वकुळ साळी समाज, भिवंडी
अध्यक्ष श्री. आनंद पावले. मोबा.९८६०५६०४९७
२)) श्री जिव्हेश्वर स्वकुळ साळी समाज, बदलापूर
अध्यक्ष श्री. अरविंद देवकर मोबा.९३२०४४२९११
३) स्वकुळ साळी समाज अंबरनाथ
अध्यक्ष श्री.कृष्णा श्रावण साळी मोबा.९९६९७७७७७५.
४) स्वकुळ साळी समाज, उल्हासनगर
अध्यक्ष श्री. मंगेश कनोजे मोबा.९३२१८८६६४५
५) स्वकुळ साळी समाज, कल्याण
अध्यक्षा सौ. प्रतिभा दळवी. मोबा.९९६९३६५९२९
६) स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था, डोंबिवली
अध्यक्ष श्री.भुषण कोळेकर.मोबा.९८२१३४५९८४
७) स्वकुळ साळी समाज ठाणे शहर
अध्यक्षा प्रा. सौ. संध्या वैद्य. मोबा.९८९२८४८९०६




## दानधर्माची व्याख्या

केस अर्पुनी कुठे पुण्य मिळते
नारळ अर्पुनी कुठे भाग्य उजळते
केस अन् नारळ विकुनी होतो व्यापार
सोनं- चांदी अर्पुन काय मिळते
सोने -चांदीच्या दागिन्यांचा होतो लिलाव
काय उपयोग सांग मानवा
अशा या दान धर्माचा ??

कधी शेतक-याला बियाणं
दान देऊन बघ
कधी निराधार कन्येचा विवाह लाऊन बघ
कधी एखाद्या निराधार बालकाचा
पालक होऊन बघ
कधी एखाद्या उपाश्याला भरवुन बघ
कधी एखाद्या अपंगाला आधार देऊन बघ
कधी एखाद्या शाळेचा जीर्णोध्दार करून बघ
कधी एखाद्या वृध्दाश्रमास
दान करून बघ
कधी एखाद्या आश्रमातील
निराधारांवर प्रेम करून बघ

एकदा दान धर्माच्या व्याख्या
बदलून तर बघ !!

***- संग्रहीत***

# श्री झिपरू अण्णा महाराज ७५वी पुण्यतिथी वृत्तांत

दिनांक १/०६/२०२४ शनिवार रोजी श्री झिपरु अण्णा महाराजाच्या ७५व्या पुण्यतिथी निम्मीत्त सकाळी रामेश्वर कॉलनी येथुन नशिराबाद (झिपरुअण्णानगर) येथे परमपूज्य संत श्री झिपरू अण्णाच्या पालखीचे जल्लोषात आगमन झाले सकाळी साडे सहाला श्री गजानन महाराज मंदीरात अण्णाचे नातू मा.श्री. रमेश लाडके आणि पणतू श्री. निलेशभाऊ लाडके यांच्या हस्ते श्री गणपती, श्री गजानन महाराज, श्री हनुमंत, श्री भगवान जिव्हेश्वर, श्री झिपरु अण्णा महाराज यांच्या आरतीने सुरुवात करुन श्री अण्णांच्या पालखीचे पुजन केले.व आनंदजी सातपुते (सुरत) यांनी श्री.अण्णाच्या भजनाने सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच पालखी सोहळ्यासाठी सुरतवरुन महासभेचे उपाध्यक्ष सर्वांचे लाडके मा. श्री. बापूभाऊ रामचंद्र भुतकर आणि सामाजिक कार्यकर्ते श्री.आनंद सातपुते, श्री. अशोक लाहोरकर, श्री. जगदीश चौधरी, श्री. भरत दिवाने, श्री. सुभाष वाव्हळ, श्री. जिग्नेश सातपुते यांच्या हस्ते भक्ती भावाने ह.भ.प. सुजित महाराज यांच्या सहकार्यानी टाळ मृदंगाच्या गजरात पालखीचे प्रस्थान नशिराबाद कडे मार्गस्थ झाले तसेच जळगांव मधील स्थानिक पालखी मडंळाचे खजिनदार श्री. गणेश नानाभाऊ) भोगरे, चि. अभिषेक भोगरे, श्री. महेश भोगरे, श्री. दिनेश साळी, चि. रुद्र साळी, श्री. सुजयशेठ धमके (पारोळा), श्री. विकासशेठ डहाके, सोहम डहाके आणि इतरांनी पालखीत सोहळ्यात सहभाग घेतला. तसेच पालखी सोहळ्याच्या यशस्वितेसाठी श्री गजानन महाराज मंदीराचे पुजारी श्री. राजाभाऊ जोशी, किशोरभाऊ कोलते, तसेच मनोहरभाऊ भालेराव आणि श्री जिव्हेश्वर युवक मंडळाचे सचिव श्री. किशोर खंडारे समाज बंधु भगिनी तसेच श्री जिव्हेश्वर महिला मंडळाचे सदस्य सौ. जयश्री डहाके, ग.भा.उषा खंडारे, सौ.दिपाली खंडारे, सौ. नेहा खंडारे, सौ. कावेरी डहाके, गायत्री भोगरे, काजल भोगरे, हंसिका डहाके आणि सर्व कु. मोक्षदा, कु. प्रिशा खंडारे बालगोपालासह सभासदांनी सहभाग घेवुन पालखी नियोजित रित्या तरसोद फाटा येथे आल्या नंतर श्री. विकासशेठ डहाके यांनी सर्व पदयात्रेकरु साठी थंड लिंबु सरबत आणि उल्पोहाराचे वितरण केले तसेच आमच्या श्री गजानन गृपचे सदस्य श्री. सुनिल नारखेडे यांनी थंड पाणी व mango fruit तर आमचे काकाश्री श्री. मोहनशेठ खंडारे यांनी सर्व भंक्ताचे थंड जल देवुन वारकऱ्यांना तृप्त केले नंतर पालखीचे परत नशिराबाद(अण्णा नगर) कडे मार्गक्रमण झाले अण्णा नगरात पोहचताच महिलानी फुगडी खेळुन उपस्थितीना भारावले व अण्णाचा जयघोष केला तदनंतर नशिराबाद येथे मंदिराचे ट्रस्ट्री श्री विनायककाका वाणी यांनी आणि तेथील समाज बाधंव श्री.नानाशेठ चिंचकर, श्री. विनोदभाऊ काळे यांनी पालखीचे जल्लोषात स्वागत केले.

तसेच नशिराबाद येथील भक्तांनी भजी जिलेबीच्या अल्पोहाराचे प्रसाद स्वरुपात वितरण केले. तिथे सुरत येथुन आलेल्या सर्व समाज बांधवानी भेटी लागे जिव म्हणजे वारकरी संप्रदायामध्ये एक वारकरी दुसऱ्या वारकऱ्यांला भेटुन जसा आनंदीत होतो तो आनंद काही वेगळाच असतो अशा जल्लोषात पालखी श्री अण्णांच्या समाधी स्थळी पोहचली आणि तिथे मंदीराच्या वतीने जल्लोषात स्वागत करुन सर्वांनी दर्शन घेतले. तसेच जळगांवातील साळी समाजाचे सदस्य श्री. सुधीर डहाके, सिध्देश डहाके, श्री चद्रंकात आदमने, श्री. नाटुशेठ भंबाळे आणि जळगांव जिल्हा साळी समाजाचे अध्यक्ष मा. श्री. अशोकजी दिवटे साहेब आणि जळगांवातील इतरत्र समाज बधूं भगिनी व स्थानिक नशिराबाद ग्रामस्थ समाज बाधंव पुण्यतिथी सोहळयासाठी उपस्थित होते. यांच्या उपस्थितीत श्री. सुधिर डहाके सहपत्नी व श्री. सुधीर खंडारे सहपत्नी यांच्या हस्ते महाआरती करुन. मंदीराच्या वतीने फार मोठ्या भंडाऱ्याचे आयोजन केलेले होते नंतर सर्वांनी महाप्रसादाचा शिस्थिने आस्वाद घेवुन परत वारकंऱ्यानी परतीचा प्रवास केला, परम पुज्य झिपरु अण्णा महाराज की जय ☐☐ जय जिव्हेश्वर ☐☐

कार्यक्रमाची क्षणचित्रे व देणगीदारांची नावे पेज १९वर पहावे.

## एकविसाव्या शतकातील गंभीर समस्या मुला- मुलींची लग्न जमणे अवघड अन टिकणेही मुश्किल.

**१) बदलती मानसिकता :** दोघांचे विचार पटत असतील तरच एकत्र रहा. स्वभाव वेगळे आहेत एकमेकांचे पटत नाही. असे वाटले तर वेगळे व्हा अशी संकल्पना रुजत आहे.

**२) सामाजिक बदल :** आज मुली उच्चशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत. आता मी सक्षम आहे तर मी का सहन करायचे असे मुलींचे म्हणणे असते.

**३) बदलती जीवनशैली :** सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे नातेसंबंधात दरी निर्माण होत आहे.तरुण पिढीच्या एकमेकांबद्दलच्या अपेक्षा बदलत चालल्या आहेत. प्रत्येकालाच स्वातंत्र्य पाहिजे त्यामुळे स्वतःमध्ये बदल करण्याची अजिबात तयारी दाखवली जात नाही.

**४) संवाद :** कमी संवाद, टीव्ही, मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुक यांच्या सतत वापरामुळे पती-पत्नीचे एकमेकांबरोबरचे संवादच कमी झाले आहेत पती-पत्नीच्या मोबाईलवरील केवळ व्यावहारिक संवादामुळे संवाद होत नाही तर वादच वाढत चालले जातात.

**५) पालकांचा हस्तक्षेप :** मुलींच्या सासरी सर्व गोष्टी तिला हव्या तशाच मिळाव्यात म्हणून मुलीच्या घरात तिच्या आई-वडिलांचा हस्तक्षेप होतो आणि लग्न झाल्यावर आपला मुलगा आपल्यापासून दूर होऊ नये म्हणून त्यांच्या संसारात मुलांचे आई-वडील सतत लक्ष घालत असतात.

**६) अहंकार :** पती-पत्नी दोघेही उच्चशिक्षित, आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे कोणी कोणाचे ऐकायचे, समोरच्याने बदलावे, मी बदलणार नाही अशा अहंकारामुळे नातेवाईकांमध्ये तणाव निर्माण होतो.

**७) इतर कारणे :** एकमेकांबद्दल गैरसमज, संशय, व्यसन, दुसऱ्याला त्रासदायक असणाऱ्या सवयी, शारीरिक व मानसिक आजार इ. कारणामुळे समस्या निर्माण होतात.

**उपाययोजना :**

**१) कुटुंब टिकवता येते :** मेड फॉर इच आदर या केवळ कल्पनेतल्या गोष्टी असतात ते अवघड व शक्य असते परंतु मेड फॉर इच आदर करायचे ठरविले तरच कुटुंब टिकू शकते.

**२) मनमोकळा संवाद :** पती-पत्नी यांनी एकमेकांना दाद देणे कौतुक करणे ज्या गोष्टी पटल्या नाहीत त्या योग्य शब्दात मनमोकळे बोलणे गरजेचे आहे.

**३) स्पर्धा टाळावी :** पती-पत्नी दोघांनी एकमेकांशी अशी स्पर्धा टाळावी तू माझ्या आई-वडीलांशी,नातेवाईकांशी नीट बोलत नाही. आता मीही तुमच्या आईवडिलांशी, नातेवाईकांशी चांगले वागणार नाही. ही भावना बदलली पाहिजे.

**४) बदल करण्याची तयारी :** मीच का बदलावे हा अहंकार न ठेवता नातेसंबंध सुधारण्यासाठी तसेच टिकविण्यासाठी स्वतःमध्ये बदल करण्याची तयारी दाखवावी.

**५) स्वीकार महत्त्वाचा :** अपेक्षेप्रमाणे जोडीदार मिळाला नाही तरीही किरकोळ मतभेद व दोषांसहीत आपल्याला त्याला स्वीकारता येईल का हा विचार प्राधान्याने करावा.

**६) जबाबदारीची जाणीव :** लग्न झाल्यानंतर येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव आणि तिने भावनेची तयारी ठेवून आपल्या भूमिका दृष्टिकोनामध्ये बदल करावेत.

**७) तडजोडीची तयारी :** कोणत्याही जोडप्यांमध्ये वाद होतातच, पण ते किती ताणायचे हे आपल्या हातात असते. वाद न वाढवता तडजोडीची भूमिका स्वीकारली तर हे वाद टोकाला जात नाहीत.

थोडक्यात आपल्याला हवे तसे सगळेच कधी मिळत नाही.पण जे मिळाले आहे ते मनापासून आणि आनंदाने स्वीकारले तर कौटुंबिक नाती टिकविणे शक्य होईल.

***संकलन : प्रा. किरण पाटील मानसोपचार तज्ज्ञ आणि समुपदेशक***

१५ कै. तुकाराम नारायण पावले व कै. श्रीमती चंद्रभागा तुकाराम पावले, महाड यांच्या स्मरणार्थ कै. मुक्तेश्वर तुकाराम पावले व सौ. सुलभा मुक्तेश्वर पावले, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

कै. श्री. श्रीकृष्ण नथू साळी (सर) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ श्री. राहुल श्रीकृष्ण साळी, पवई (मुंबई) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# घराचे वास्तुशास्त्र

जिथे आपण सर्वजण एकत्र राहतो, एकमेकांना आधार देतो, सुखदुःखे वाटून घेतो. ती वास्तू फक्त आनंदी नसावी तर समाधानी असावी. आनंद हा भौतिक पातळीवर असतो आणि समाधान आत्मिक पातळीवर असते.

☐ साखर, लिंबू, मीठ हे सारे पदार्थ आपापल्या आनंदात एकत्र रहातात. पण जेंव्हा ते एकमेकांत मिसळतात, तेंव्हाच विलक्षण मधुर चवीचे सरबत तयार होते. त्यासाठी लिंबाला कापून आणि पिळून घ्यावे लागते तर मीठ व साखरेला पाण्यात विरघळून एकजीव व्हावे लागते.

☝ म्हणून पती-पत्नी एकमेकांना अनुरूप असण्यापेक्षा एकरूप असावेत. कारण गृहमंदिरात जर पती-पत्नी मनाने एकरूप झाले, तर चवदार सरबत नाही तर मधुर-अमृत तयार होईल.

✌ आपले आईबाबा एकमेकांशी किती प्रेमाने वागताहेत हे बघून मुलांच्या मनावर आणि शरीरावर अत्यंत शुभ परिणाम होतो.अन्यथ: ती मनातल्या मनात कुढत राहतात.

☐ मुले ही अनुकरणप्रिय असतात. आईचा कडवट चेहरा, वडिलांचा आरडा-ओरडा, घराचा अक्षरशः उकिरडा करतो. आणि मग वास्तुतज्ज्ञ या समस्येच्या मुळाशी न जाताच फक्त अतार्किक, अशास्त्रीय आणि बिनबुडाचे उपाय सुचवितो. आणि आपण निर्बुद्ध मंडळी त्यावर हजारो रुपये खर्च करुन पस्तावतो.

☐ अरे, बाबांनो कोणी बाहेरच्या माणसाने भरपूर पैसे घेऊन तुमच्या घरात 'शांती' आणणे शक्य आहे का.?!!!

तुम्ही घरातली सर्व मंडळी समंजसपणे वागून, एकमेकांवर प्रेम करून वास्तू समाधानी ठेवू शकता.

☐ ज्येष्ठ नागरिकांनी प्रकृती साथ देत असेल तर, अर्थार्जन करून मुलांना हातभार लावावा.

रिटायर्ड लाईफ म्हणजे निष्क्रियता नव्हे. काहीही कारण नसताना सारखे लोळत पडलेली माणसे घरात हॉस्पिटलचे वातावरण तयार करतात.

मुलांनीही जन्मभर कष्ट केलेल्या आई-वडिलांशी खूप नम्रतेने वागावे. त्यांच्या चुका काढत बसू नये. सून म्हणून आपले सारे विश्व सोडून आपल्या घरी आलेल्या मुलीला खूप प्रेम आणि आधार द्यावा. ती खूप पुढारलेल्या वातावरणात शिकलेली आधुनिक मुलगी आहे. आपणच जनरेशन गॅप कमी करावा. अर्थात सुनेने सुद्धा सासरी सर्वांना असा लळा लावावा, की सून माहेरी गेली की सुनं-सुनं वाटलं पाहिजे.

☐घरात मेणबत्या फुंकून आणि डोक्यावर कचरा पाडून घेऊन वाढदिवसाचा धांगडधिंगा करण्यापेक्षा मुलाचे निरांजन ओवाळून औक्षण करावे. भोजनाचे वेळी आनंदी वातावरण ठेवावे. पत्नी जेवली का विचारपूस करावी. घरामध्ये सर्वांनी खूप संयमाने बोलावे.एकमेकांच्या चुका पदरात घ्याव्यात. एकजण चिडला तर दुर्सय़ाने शांत बसावे.

☐ पहा ना,गवत नसलेल्या जागी पडलेला अग्नी जसा आपोआप शांत होतो, तसे सारे शांत होईल. चालतानाही घरात पाय आपटू नयेत. शांतपणे वस्तू हाताळाव्यात.उगीचच भांड्यांची आदळ-आपट करु नये. पुरुषांनीही घरात नीटनेटके रहावे. सतत फक्त बायकांनीच सदाफुलीसारखे टवटवीत राहावे, ही अपेक्षा बरोबर नाही.

अशी राहते समाधानी वास्तु!

म्हणून म्हणतो, तुम्हीच व्हा तुमचे वास्तुतज्ज्ञ
आणि करा आपली वास्तुदेवता प्रसन्न. !!

***- संग्रहीत - ईश्वरलाल साळी***

# भावपूर्ण श्रद्धांजली







**गं.भा. शांताबाई फुलचंद नाशिककर**

मृत्यू दि. २४-५-२०२४

वय वर्ष १०६

***''चंदनापरी देह झिजवला, कष्टातुन वसंत बहरला,***
***नाही उरली साथ आम्हाला, आठवण येते क्षणोक्षणाला''***

**-: शोकाकूल :-**

दशरथ फुलचंद नाशिककर
लालचंद फुलचंद नाशिककर
ताराचंद फुलचंद नाशिककर
गोपाळ फुलचंद नाशिककर
बाबुलाल फुलचंद नाशिककर
अशोक फुलचंद नाशिककर
गं.भा.शोभा भोगरे
सुभाष दशरथ नाशिककर
सुनीता दशरथ नाशिककर
संगीता दशरथ नाशिककर
सुशीला दशरथ नाशिककर
उदयकुमार लालचंद नाशिककर
नीता लालचंद नाशिककर
मनीषा लालचंद नाशिककर
भरत ताराचंद नाशिककर
मुकेश ताराचंद नाशिककर
ज्ञानेश्वर ताराचंद नाशिककर
गीता ताराचंद नाशिककर
पुनम ताराचंद नाशिककर
दिपक गोपाळ नाशिककर
राजू गोपाळ नाशिककर
संजू गोपाळ नाशिककर
पंडित गोपाळ नाशिककर
वैशाली गोपाळ नाशिककर
गोविंद बाबूलाल नाशिककर
मुन्नी बाबूलाल नाशिककर
प्रशांत अशोक नाशिककर
प्रीती अशोक नाशिककर
आरती अशोक नाशिककर
पूजा अशोक नाशिककर

कै. विठोबा गणपत कोळेकर (नाना कोळेकर) मुरुड-जंजिरा यांच्या स्मरणार्थ सौ. स्नेहलता जांभळे, सौ. अंजली वखारे, सौ. निलीमा काळे, सौ. सुजाता बत्तीन व सौ. नेहा डहाके यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## 'एक करायला गेलं तर'
## एक राहूनच जातं.

सकाळी फिरायला गेलं तर,
साखरझोपेचं सुख राहून जातं .
शांततेने पेपर वाचू लागलो तर,
पूजा, प्राणायाम राहून जातो .
दोन्ही साधायचा प्रयत्न केला तर,
नाश्ताच राहून जातो .
धावपळ करत सगळं केले तर,
आनंद हरवतो .
डायट फूड मिळमिळीत लागतं,
चमचमीत खाल्लं तर वजन वाढतं .
एक करायला गेलं तर,
एक राहूनच जातं.
नोकरीसाठी कुटुंब सोडायचं नाही,
पण कुटुंबासाठी नोकरी हवी.
दोन्ही सोडायच्या कल्पनेने
भिती वाटायला लागते .
लोकांचा विचार करता करता,
मन दुखावतं,
मनासारखं वागायला गेलो तर,
लोक दुखावतात .
एक करायला गेलं की,
एक राहूनच जात
घाईगडबडीने निघालो तर,
सामान विसरते,
सावकाश गेलो तर,
उशीर होण्याची भीती वाटते.
सुखात असलो की,
दुःख संपतं, आणि
दुःखात असलो की,
सुख जवळ फिरकत नाही.
एक करायला गेलं की,
एक राहूनच जातं .
पण या काहीतरी राहून जाण्यातच,
खरा जीवनातील आनंद आहे.
काहीतरी मिळाल्याचे समाधान आहे.
कारण बाळ जन्मल्याबरोबर,
त्याच्या रडण्यात आनंद आहे,
आणि अचानक दुरावलेली व्यक्ती,
कित्येक वर्षांनी भेटल्यावर,
आनंदातही रडणे आहे.
कधी रडण्यातही आनंद मिळतो,
तर कधी आनंदातही रडता येतं.
ज्याला या कुठल्याच गोष्टीचे
काही विशेष वाटत नाही
तो माणूस नाही,
तर यंत्रच आहे.
म्हणून आनंदाने
भरभरून जगून घेऊ या .
आजचा दिवस आहे
तो आपला आहे .

***संग्रहीत - श्री. ईश्वरलाल साळी***

# श्री झिपरुअण्णा महाराज पुण्यतिथी निमित्त २०२४ च्या पालखी सोहळ्याची क्षणचित्रे



## श्री झिपरुअण्णा महाराज पुण्यतिथीनिमित्त २०२४ च्या पालखी सोहळ्यासाठी योगदान दिल्याबद्दल आमच्या पालखी मडंळाकडुन सर्व भाविक भक्तांचे खूप खूप आभार...

सौ.निशा विजय वक्तें .ए.इच्या प्रमुख विश्वस्त मुबंई-१११२/-
सौ.शैलजा सोमनाथ कासटकर व श्री.सोमनाथ रतिलाल कासटकर मुबंई - १००१/-
श्री.राजेश बबनराव खेडकर जळंगाव १००१/-
श्री.सुधीर गजानन खंडारे जळगाव १००१/-
श्री.मुकेश नाटेश्वर भंबाळे जळगाव १००१/-
श्री.रमेशचंद्र शंकरराव लांडगे(लाडके) सुरत १००१/-
श्री.दिपक विनायक लांडगे (लाडके) सुरत १००१/-
श्री.किशोर रमेश खंडारे जळगांव १००१/-
श्री.चंद्रकांत माधवराव आदमने १००१/-
श्री.सुधीर देविदास डहाके जळगांव १००१/-
श्री.प्रसाद विष्णुपंत साळी जळगांव १००१/-
सौ.निर्गुणा अशोक दिवटे व
श्री.अशोक माधवराव दिवटे जळगांव १००१/-
श्री.रमण रघुनाथ खेडकर सुरत ५०१/-
श्री.किरण निबांलाल धमके जळगांव ५०१/-
श्री.दत्तात्रय गणेश डहाके जळगांव ५०१/-
श्री.एकनाथ पोपट वैद्य जळगांव ५०१/-
श्री.विलासदादा भालचंद्र साळी जळगांव ५०१/-
श्री.प्रकाश झिपरु खंडारे नाशिक ५०१/-
श्री.गोपाल रामदास भिगांरे संभाजी नगर ५०१/-
श्री.राजीव रमेश धरम आँ.फॅ वरणगाव ५०१/-
श्री.नंदन वसंतराव वळींकर यावल ५०१/-
श्री.संजय ईश्वरलाल भोगरे धरणगाव ५०१/-
सौ.हंसाबेहन प्रकाश खंडारे अहमदाबाद ५०१/-
श्री.पद्माकर बाबूराव आखडकर जळगांव ५०१/-
श्री.गणेश बळीराम भोगरे जळगांव ५०१/-
श्री. विजय रमेश खंडारे गोरेगाव मुबंई ५०१/-
सौ.पुष्पालता ताई रविंद्र साळी -
श्री. रविंद्र माधवराव साळी जळगांव ५०१/-
श्री.मिलिंद पंडीतराव साळी एंरोडोल ५०१/-
श्री.प्रशांत गजानन खंडारे संभाजी नगर ५०१/-
अँड.श्री.बाळकृष्ण पांडुरंग साळी जळगांव ५०१/-
श्री.शिवाजी लक्ष्मण धरम पुणे ५०१/-
श्री.रुपेश गोटूशेठ खंडारे नाशिक ५०१/-
श्री दिनेश सुरेश साळी जळगाव ५०१/-
श्री.मनिष बाबूराव वाझट जळंगाव ५०१/-
श्री.गणेश रतिलाल कासटकर ठाणे ५०१/-
श्री प्रभाकर भिका धमके पारोळा ५०१/-
श्री सुजय प्रभाकर धमके पारोळा ५०१/-
श्री.अनिल रघुनाथ भोगरे धरणगाव ५०१/-
प्रा.डॉ श्री आशिष दिनकरराव विखार जळगांव ५०१/-
श्री.चेतन अशोक डहाके जळगांव ५०१/-
श्री.गोविदराव सुकलाल कासटकर जळगांव ५००/-
श्री भुषण प्रकाश धरम जळगांव ५०१/-
श्री.प्रणव दिलिप आखडकर जळगांव ५०१/-
श्री प्रमोद डीगबंर भोगरे जळगाव २५१/-

तरसोद फाटा येथे चहा नास्ता ची व्यवस्था सौ.कावेरी-श्री विकासशेठ सुभाष डहाके यांच्या तर्फे आयोजित केलेली होती ज्या भक्तंतानी पालखी मडंळाला विशेष योगदान देवुन सहकार्य केले त्यांचे श्री झिपरु अण्णा पालखी मडंळातर्फे खूप खूप मन:पूर्वक आभार आणि दरवर्षी आम्हाला असेच मार्गदर्शन आणि सहकार्य करतील अशी अपेक्षा करतो.

**।।जय झिपरुअण्णा महाराज की जय।।**
**।।जय भगवान जिव्हेश्वर की जय।।**

कै. तुकुबाई नागप्पा टोणपे (आई), कै. नागप्पा दामोदर टोणपे (वडील) व कै. दामोदर नागप्पा टोणपे (बंधू), सोलापूर यांच्या स्मरणार्थ श्री. मोहन नागप्पा टोणपे, वडाळा - मुंबई यांच्या सौजन्याने पृष्ठदान

# उपवर मुलींची नावे

**१) कु. ज्ञानेश्वरी**



ज. ता. ०८/१२/९७,
ज.वेळः रात्री २१.०५,
ज. स्थळः अंबरनाथ

रास : मीन, नक्षत्रःउत्तर भाद्र चरण, गणः मनुष्य,
नाडीः मध्य, उंचीः ५'४'', वर्णः गोरा,
शिक्षणः Sy, BA (App.), अपेक्षा- -अनुरुप.
पत्ता : **श्री. राजेंद्र साळी,**
रुम नं.१०, युसुफ शेख चाळ, जुन्या पोलिस स्टेशन जवळ, नाना पाटील प्राईड समोर, वांद्रापाडा,अंबरनाथ (पश्चिम) - ४२१५०१,
श्री. राजेंद्र भगवान साळी (मामा)
मोबा. ९३२४६१८९६१
श्री. प्रविण रतिलाल लांबोळे (काका)
मोबा. ८६५२०१८८८१ -(५/२४)

**२) कु. कोमल (घटस्फोटीत)**



ज. ता. ३१/१०/८८,
ज.वेळः रात्री १०.४०,
ज. स्थळः जळगांव

रास : कर्क, नक्षत्रः पुष्प, गणः देव, चरणः २रे,
नाडीः मध्य, उंचीः ५'३'', रक्तगटः B+ ,
वर्णः गोरा, शिक्षणः B.Com, MSCIT,
Computer Course, Beauty Parlour
व्यवसायः ब्युटीपार्लर, अपेक्षा- -अनुरुप.
पत्ता : **श्री. बारसु रामदास सितफळे,**
बी-३०३, ऋतुव्रत सोसायटी, आनंद नगर, दिनदयाळ रोड, डोंबिवली (प),
जि. ठाणे - ४२१२०२, मोबा. ९३२६१८२४३५ -(९/२४)

**३) कु. प्राजक्ता**



ज. ता. १५/०२/९९
ज.वेळः पहाटे ०४.००,
ज. स्थळः अहमदनगर

रास : , नक्षत्रः , गणः , ,
उंचीः ५'७'', रक्तगटः B+ , वर्णः गहुवर्ण,
शिक्षणः Graduate in Interior designing,
अपेक्षा- - उच्चशिक्षित, प्राधान्य पुणे,मुंबई आणि मुंबई उपनगर
पत्ता : **श्री. गणेश पुरुषोत्तम अष्टेकर,**
४०१, प्लॉट नं. ७७, शिव प्रतिक सोसायटी, सेक्टर -४ ए, असुडगाव, खांदाकॉलनी, पनवेल नवी मुंबई,
मोबा. ९८९२४०७६७५/९६१९४९७८७० -(५/२४)

**४) कु. दिप्ती**



ज. ता. १९/०३/९७
ज. वेळः १६.२०
ज. स्थळः चंद्रापूर

रास : कर्क, नक्षत्रः पुष्प, गणः देव, चरणः २रे,
नाडीः मध्य, उंचीः ५'०'', रक्तगटः B+ ,
वर्णः गोरा, शिक्षणः B.Sc. (Computer Science) Now Purusing MCA-1yr from Nagpur University,
व्यवसायः ब्युटीपार्लर, अपेक्षा- -अनुरुप.
टिपः मुलगी कर्णयंत्राचा वापर करते.
पत्ता : **श्री. प्रकाश महादेवराव खरटकर**
अयोध्या नगर, नागपूर - ४४००२४
मोबाः ९५११८३५४६५
E-mail: pmkharatkar@redifmail.com -(१२/२५)

**५) कु. ऐश्वर्या**



ज. ता. १६/१२/९४,
ज.वेळः सकाळ ६.५५
ज. स्थळः कराड

रास : वृषभ, नक्षत्रः कृतिका, गणः राक्षस,
चरणः २रे, उंचीः ५'५'', रक्तगटः
वर्णः गोरा, शिक्षणः B.E. (IT) Sr. Software Engineer
नोकरीः नामांकित कंपनीत, मा. प्रा.: १,००,०००/-
अपेक्षा- -अनुरुप, मुंबई-ठाणे स्थळांना प्राधान्य

पत्ता : **श्री.** श्रीनिवास विश्वनाथ सपार
ए, १०३-१०४, श्रीसमृध्दी हौ. सोसा., पुनम गार्डन, मीरारोड (पूर्व) ४०११०७
मो.: ९८६९०६०४८५ -(५/२३)

**६) कु. डॉ. स्नेहल**



ज. ता. ०९/०६/१९९६,
ज.वेळः सायंकाळी ६.५०
ज. स्थळः ओझर (मिग) नाशिक

रास : मीन, नक्षत्रः उ.भाद्रपदा, गणः मनुष्य,
चरणः - २रे, उंचीः ५'४'', रक्तगटः B +ve
वर्णः गोरा, शिक्षणः M.B.B.S. (Rassia)
Registration with Govt. Of Maharashtra & Delhi Govt.
सध्या पोस्ट ग्रॅज्युएशन ची तयारी करत आहे.
अपेक्षा- -अनुरुप,एम.डी./एम.एस.
पत्ता : **श्री.** उदयकुमार लालचंद साळी (नाशिककर)
नवगगनगिरी अपार्टमेंट, फ्लॅट क्र.०२, अंबिका दर्शन जवळ ,वडवली विभाग , अंबरनाथ (पूर्व) - ४२१ ५०१.
मो.: ९८२३३८६१३९ (वडील), ८३०८७००३५० (आई) -(३/२५)

**७) कु. पल्लवी**



ज. ता. २५/०८/१९८२
ज. वेळः सकाळी ८.२५
ज. स्थळः कोपरी, ठाणे

रास : तुळ, नक्षत्रः विशाखा, गणः राक्षस, चरणः २रे,
नाडीः अंत्य, उंचीः ४'११'', रक्तगटः O+
वर्णः गव्हाळ, शिक्षणः B.Sc. (Nursing)
General Nursing Midwife (GNM)
नोकरीः टी.एम.सी. मेडीकल डीपार्टमेंट, ठाणे. वा.प्रा.७ लाख
अपेक्षा- -अनुरुप, मुंबई, ठाणे स्थळांना प्राधान्य
पत्ता : **श्री. रामचंद्र दत्तु शिंगारे**
प्लॉट नं.४१०, पाटलीपाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प.). मोबाः ९८९२९५१३७२ (भाऊ), ९८९०७१६२१४ (मामा) -(११/२४)



**दि.१७/८/२०२४**
**भगवान श्री जिव्हेश्वर उत्सवास**
**स्वकुळ समाचारतर्फे**
**हार्दिक शुभेच्छा !**




कै. सौ. शर्मिला हिच्या स्मरणार्थ श्री. व
सौ. शामला सुरेश हरवंदे (महाड) यांच्या सौजन्याने पृष्ठदान

# उपवर मुलांची नावे

## १) चि. रिंकेश



ज. ता.: २६/०८/१९९७
ज. वेळ: सकाळी ७.५८
ज. ठि.: श्रीवर्धन

रास : वृषभ नक्षत्र : रोहिणी चरण : चौथे
नाडी : अंत्य वर्ण : गव्हाळ
रक्त गट : O +ve उंची : ५.८
शिक्षण : बी टेक (मेकॅनिकल), एम.बी.ए. (ऑपरेशन)
नोकरी : सन फ्रेटोकेमिकल, मुंबई (सि.ऑफिसर इन सप्लाय चेन डिपार्टमेंट)
प्राप्ती : ६.५ लाख रुपये - वार्षिक
पत्ता : मैत्री पार्क जवळ, ज्योतिबा नगर, लोणंद, सातारा. अपेक्षा : इंजिनियर एम.बी.ए.
वडिलांचे नाव : श्री संजय जनार्दन पाटणकर
संपर्क : ९१४५२६२३६२/९८९०५७३९५१
(०५/२४)

## ५) चि. युवराज



ज. ता. १/११/८९,
ज. वेळ: रात्री १०.४०
ज. स्थळ: पुणे

रासः वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, चरण : 1 ले,
नाडी : आद्य, गण : राक्षस, वर्णः गव्हाळ,
उंचीः ५'२'', रक्त गट : A +ve
शिक्षण : BE (Biomedical)
नोकरी : Biomedical Engineer in a Coporate Multi Speciality Hospital
अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **श्री. अरुण भास्कर बागडे,**
५०४, सखाराम टॉवर को. ऑप. हौ. सोसा., विजेता बिल्डींग समोर, ठाकुर्ली (पूर्व)
पोस्ट-डोंबिवली-४२१२०१
मोबा. ९५९४८९९०००
-(९/२४)

## २) चि.विनायक



ज. ता. १६/११/९३,
ज.वेळ: सकाळी ८.३१
ज. स्थळ: अहमदनगर

रासः धनु, नक्षत्रः जेष्ठा, नाडीः आद्य, चरणः १ले,
गणः राक्षस, वर्णः निमगोरा,
उंचीः ५'१०'', रक्तगटः B+
शिक्षण : B.Com MBA Fin.
व्यवसाय : शेअर्स मार्केट ट्रेडिंग आणि क्लासेस
मा. प्राः १५ हजार
अपेक्षाः ग्रॅज्युएट, अनुरुप, सुसंस्कृत, मनमिळाऊ
पत्ता : **श्री. सुरेश प्रभाकर मानकर,**
"बहार", पितळे कॉलनी, गणपती मंदिरा जवळ, नागापूर, अहमदनगर - ४१४१११
मो. : ८६०५२९३१८०
(1/2026)

## ६) चि. समीर



ज. ता.:०७/०४/१९९०
ज. वेळ: सकाळी १०.४५
ज. ठि.: सोलापूर

रास : सिंह नक्षत्र : पुर्वा भाद्रपदा
नाडी : मध्य चरण : तिसरे
रक्त गट : Ab +ve
शिक्षण : बी. ई. (मेकॅनिकल)
नोकरी : असिस्टंट मॅनेजर, झेड एफ इंडिया प्रा.लि. चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१
प्राप्ती : ११.५० लाख रुपये - वार्षिक
पत्ता : श्री सुरेश विष्णू हेमाडे, गोदावरी अपार्टमेंट, फ्लॅट नं. बी /४, आनंद नगर, सनसिटी रोड, वडगाव ब्रु पुणे
संपर्क : ९९६०७४३४२९ / ९८९०६८८८४४
-(०९/२४)

## ३) चि. संदीप



ज.ता. १७/०८/१९८६
ज.वेळ: ४.०५ पहाटे

रासः धनु, नाडीः मध्य,
जन्म ठिकाण : मुलुंड, उंची : ५.७
शिक्षण : B Com
नोकरी : बँक ऑफ बरोडा
अपेक्षा : अनुरूप, मुंबई प्राधान्य
पत्ता : **श्री. रमेश शिवराम डोईफोडे,**
जाबुवंत हौ. सोसायटी, तळ मजला, बी विंग, रुम नं.५, सालासार नगर, पाटील पाडा, बदलापूर (पूर्व) ४२१५०३
मोबाईल नंबर : ९६५३३६११०७
(1/2025)

## ७) चि. संकेत



ज. ता.: २७/०४/१९८७
ज. वेळ: रात्री ११.००
ज. ठि.: पुणे

नक्षत्र : अश्विनी गण : देव
नाडी : आद्य चरण : तीसरे
रक्त गट : B+ve उंची : ५.५
शिक्षण : G.D. Arts Commercial (BFA) UX/UI Course from Design boat UX/UI
नोकरी : Think design Coffaborative UX/UI Designer वा.प्राप्ती : रु.५ लाख
वडील : गव्ह्. डेरीतून निवृत्त इंजिनीअर
आई : प्रायव्हेट जॉब निवृत्त
अपेक्षा : अनुरुप
पत्ता : श्री. अनिल विष्णू साळी, १२९/५ दत्तवाडी, माधवराज अपार्टमेंट, पुणे ४११०३०
संपर्क : ९३७१८८४६८४ (आई)
९०४९२९४८९२ (संकेत)
-(०३/२५)

## ४) चि. उत्कर्ष



ज. ता. १७/०९/९२,
ज. वेळ: संध्या. ६.०२
ज. स्थळ: बेलापूर (नवीमुंबई)

रासः वृषभ, नक्षत्रः कृतिका, रक्तगटः O+
उंचीः ५'७'',
शिक्षण : Bsc Hospitality Study (Hotel Management)PG-DM in Travel tourism
नोकरी : Morning Star, Vashi - Navi Mumbai
वा.प्रा.: ५ लक्ष
अपेक्षाः पदवीधर, नोकरीस प्राधान्य
पत्ता : **श्री. दिनकर एच. चांदुरकर,**
A-१०२, अंगद-२, प्लॉट नं. २६A, सेक्टर-८B सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई,
मोबा.: ९८१९७७९१२९
(1/2025)

## ८) चि. अक्षय



ज. ता.: १/०६/१९९६
ज. वेळ: दुपारी १.१०
ज. ठि.: अहमदनगर

रास : मिथुन (०१/२४)
नक्षत्र : आद्रा (नक्षत्र शांती केली आहे.)
नाडी : आद्य चरण : चौथे गण : मनुष्य
रक्त गट : A +ve उंची : ५.७ वर्ण : गहू वर्ण
शिक्षण : ९ वी पास अपंगत्व : ४५%
अपेक्षा : अनुरुप, शिक्षित व मन मिळावू
नोकरी : दुकानात कामाला आहे (बदलापूर-प.)
प्राप्ती : १४ हजार मासिक
आई : श्रीमती शारदा महेश टपळे
पत्ता : श्री सुरेश ज्ञा. टपळे, बी-७०५, संस्कार धाम, मांजर्ली रोड,हरीओम स्वीट जवळ, कुळगाव, बदलापूर
संपर्क : अक्षय टपळे - ८६००६८४६०४
सुरेश टपळे (काका)-९५०३०८७६३२ (7/2024)

कै. गोविंद बाळकृष्ण निमकर व कै. सौ. लक्ष्मीबाई गोविंद निमकर, कुडली यांच्या स्मरणार्थ
श्री. धोंडू गोविंद निमकर यांच्या सौजन्याने पृष्ठदान

## उपवर मुलांची नावे

### ९) चि. निलेश



ज.ता. २१/०२/१९८७
ज.वेळ: दुपारी ४.१५
जन्म स्थळ : उमरगांव

रास: वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा,
गण: देव, नाडी: मध्य, चरण: दुसरे
ऊंची: ५'५' वर्ण: गोरा, रक्तगट: A+ve
शिक्षण: बी.ए./मल्टीमिडीया डिप्लोमा
व्यवसाय/नोकरी : ग्राफिक्स डिझायनर -व्हिज्युअलायझर
कंपनीचे नाव : असेंड ॲडकॉम, ठाणे
ऊत्पन्न : ७,८०,००० वार्षिक
अपेक्षा : अनुरूप
पत्ता: **श्री. सुरेश वसंतराव खडामकर**,
घर नं. ८१, नवीन प्रेमदान हडको,
कैलास कॉलनी शेजारी,सावेडी,अहमदनगर-४१४००३.
Mob:८०८७४७९७२८,७५०७९४६७८६ Email : neeleshatoz@gmail.com
-(०५/२४)

### १०) चि. दुर्गेश



ज.ता. २३/११/१९९८
ज.वेळ: दुपारी २.०१
जन्म स्थळ : ठाणे

रास: धनु, नक्षत्र : पुर्वषाढा,
गण: मनुष्य, नाडी: मध्य, चरण: चौथे,
ऊंची: ५'११" वर्ण: सावळा, रक्तगट: A+ve
शिक्षण: बी.ई.(कॉम्प्यूटर)
व्यवसाय/नोकरी : Accenture
कंपनीचे नाव : नागोरा
उत्पन्न : पॅकेज १४ लाख
अपेक्षा : अनुरूप, नोकरी असलेली
पत्ता: **श्री. अनिल शिवाजी उगले**
न्यू पंचदिप सोसायटी, ५/बी/४०३, मनिषानगर नं.१, कळवा, ठाणे-४०० ६०५.
Mob:९२२०१४८४५२
-(०७/२४)

### ११) चि. पुर्ष्पेंद्र



ज. ता.: १९/०७/१९९२
ज. वेळ: दुपारी ३.००
ज. ठि.: एरंडोल

रास : धनु नक्षत्र : मुळ ( शांती केलेली आहे )
नाडी : आद्य गण : राक्षस
रक्त गट : O+ve उंची : ५.५
शिक्षण : बी.ई. कॉम्प्युटर सायन्स
नोकरी : सॉफ्टवेअर इंजिनियर( एम.एन.सी) हैदराबाद
प्राप्ती : १५.५ लाख वार्षिक
पत्ता : एं४०६, ओम मंगलम चैतन्य, किवळे चौक, वाकड, पिंपरी चिंचवड, पुणे.
अपेक्षा : अनुरुप
वडिलांचे नाव : श्री नंदकिशोर देवीदास देवकर
संपर्क : ९९२६१४०९०१/९९९३८८२४४८
-(०७/२४)

### १२) चि. राज



ज.ता. ०१/०६/१९९५
ज.वेळ: दुपारी २.५५
जन्म स्थळ : ठाणे

रास: मिथुन, नक्षत्र : स्वाती,
गण: मनुष्य, नाडी: आद्य, चरण: चौथे,
ऊंची: ५'९" वर्ण: Fair, रक्तगट: A+ve
शिक्षण: बी.ई.(E & TC)
व्यवसाय/नोकरी : OCS Services India Pvt.Ltd. (ONGC) IT Engineer
उत्पन्न : ४ लाख
अपेक्षा : अनुरूप
पत्ता: **श्री. दिलीप मोहन भोबेकर**
२८ए/४३, वृंदावन सोसायटी, माजीवाडा रोड, श्रीरंग सोसायटी जवळ, ठाणे (प.)-४०० ६०१
Mob:९७६८२८६०२६, ८६८९८२८५४५
-(०९/२४)

### १३) चि. शुभम



ज.ता. ०५/११/१९९६
ज.वेळ: रात्री ११.४८
जन्म स्थळ : नाशिक

रास: सिंह, नक्षत्र : मुळ, चरण: १ले,
गण: मनुष्य, नाडी: मध्य, वर्ण: निमगोरा
ऊंची: ५'५" रक्तगट: B+ve
शिक्षण: B.Arch. Pune University
नोकरी : L&T, Mumbai Sr. Arch
वा.प्रा. : ७ लाख
अपेक्षा : अनुरूप, उच्च शिक्षीत
पत्ता: **वैशाली सुहास दातरंगे**
१, मोनार्च अपार्टमेंट, शंकरनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.
Mob:९६०४८३८०५६, ९३२६१५१९८१
-(०५/२५)




## वधू वर परिचय पत्र नमुना

मुलाचे /मुलीचे नाव :-
जन्मतारीख :- जन्मस्थळ :-
जन्मवेळ :- जन्मवार :-
रास :- नक्षत्र :-
चरण :- नाडी :-
गण :- वर्ण :-
रक्तगट :-
उंची :- फूट इंच
पोट जात :- शिक्षण
नोकरीचे स्वरूप व ठिकाण :-
मासिक प्राप्ती :- अपेक्षा :-
मामाचे नाव :-
आई वडिलांचे नाव :-
पत्ता :- मोबाईल नंबर :-

**या वर दिलेल्या नमुना प्रमाणे वधू-वरांची माहिती पाठवावी**

कै. भगवान नागोजी माटोले व कै. श्रीमती कुसुम भगवान माटोले (देऊळगावराजा) यांच्या स्मरणार्थ
सर्वश्री वसंत, प्रकाश व किशोर माटोळे बंधू यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## विश्वस्त निधी

| | | | |
|---|---|---|---|
| १६१) श्री. विजय गोविंद वैद्य,चिपळुण | १,०५१ | १६२) सौ. प्रभावती प्रकाश डरंगे,नाशिक | १,००१ |
| १६३) श्रीमती रंजना श्रीकांत गोंगे,मुंबई | १,००१ | १६४) श्रीमती कुसुम विष्णुपंत भोगरे,उल्हासनगर | १,००१ |
| १६५) सौ. गिता सुदर्शन भंडारे,कोल्हापुर | १,१११ | १६६) श्री. मुकुंदराव ज्ञानोबा खुस्तले,पुणे | १,००१ |
| १६७) सौ. संजिवनी अशोक तांबे,नाशिक | १,००१ | १६८) श्री. सुरेश बाबुराव रोडे,नाशिक | १,००१ |
| १६९) श्री. सुभाष विष्णुपंत धारणकर,पुणे | २,००१ | १७०) श्री. रमेश शंकरराव लांडगे,सुरत | १,००१ |
| १७१) सौ. निलम प्रभाकर गोंधळेकर,मुलुंड | १,००१ | १७२) डॉ. विलास दशरथ आचारी,कोपरगाव | १,००० |
| १७३) श्री. सुर्यकांत बा.ढवण,मुंबई | १,०५० | १७४) सौ. शांता निवृत्ती गायकवाड,सोलापूर | १,१५० |
| १७५) श्री. अनिल पा. चाफळकर (जंत्रे),मुंबई | ५,००० | १७६) सौ. मंगला हरिष अष्टेकर,मुंबई | १,००० |
| १७७) श्री. यशवंत विठ्ठल बीडकर,कल्याण | १,००० | १७८) सौ. उषा यशवंत बीडकर,कल्याण | १,००० |
| १७९) श्री. संजय संभाजी ढवण,चिपळुण | १,००१ | १८०) श्री. प्रभाकर नारायण लांडगे,उल्हासनगर | १,००१ |
| १८१) आशिष श्रीकांत एखे,बंगलोर | १,००१ | १८२) श्री. हनुमंत विठ्ठल घुबे,पुणे | १,००१ |
| १८३) श्रीमती व्दारकाबाई प्रल्हाद साळी,उल्हासनगर | २,७७५ | १८४) श्री. मिलींद चंद्रकांत जांभळे,अंबरनाथ | १,००१ |
| १८५) श्रीमती समिता रविकांत ढोरजे,अंबरनाथ | १,००१ | १८६) सौ. वसुंधरा गंगाधर काळे,मनमाड | १,००१ |
| १८७) श्री. सत्यजीत रघुनाथ घटे,ठाणे | १,००१ | १८८) श्री. अनंत गजानन जंत्रे,नाशिक | १,००१ |
| १८९) ॲड. अरुण गणपतराव बडवे,इचलकरंजी | १,००१ | १९०) श्री. दिलीप वसंतराव मेन,अमरावती | १,१११ |
| १९१) श्री. सदानंद रामचंद्र हुबळीकर,पुणे | १,००१ | १९२) श्री. गंगाधर शिवराम भंडारे,नवीमुंबई | १,००१ |
| १९३) सौ. अनुपमा गंगाधर भंडारे,नवीमुंबई | १,००१ | १९४) श्री. निनाद मधुकर देसाई, पुणे | १,००० |
| १९५) श्रीमती शालिनी बाळकृष्ण साळी,कल्याण | १,५०० | १९६) श्री. राजु बाबुराव जिंदे, भिवंडी | १,१११ |
| १९७) श्री. राजन मगनलाल बाळदे,बेळगाव(मस्कत) | १,५०१ | १९८) प्रा. डॉ. व. झा. साळी, पुणे | २,००१ |
| १९९) सौ. जनाबाई चंद्रसेन गणेश, सोलापूर | १,५०० | २००) सौ. रत्नमाला शशिकांत डहाके,ठाणे | १,५१५ |
| २०१) श्री. दिगंबर लालचंद भागवत,अंबरनाथ | १,५०१ | २०२) श्री. प्रमोद बळीराम किचंबरे,बदलापूर | १,५०० |
| २०३) श्री. प्रकाश ज्ञानेश्वर किचंबरे,बदलापूर | १,५०१ | २०४) श्री. प्रकाश नामदेराव दैव, पुणे | १,५०१ |
| २०५) सौ. रुपाली अमित शेकटकर, खारघर | २,००१ | २०६) श्री. किसनराव भानुदास एडके, पुणे | १,५०० |
| २०७) श्री. विलास बाबुराव सरोदे, औरंगाबाद | १,५०१ | २०८) श्री. बबन रामभाऊ भंडारे, नाशिक | १,५०१ |
| २०९) सौ. रश्मी प्रविण जयदेवकर, नवीमुंबई | १,५०० | २१०) डॉ. भरत नानासो. तांबे, सासवड | १,५०० |
| २११) श्री. जगन्नाथ धोंडीबा जुजार, कांदीवली | १,५०१ | २१२) श्री. रमेश गोपाळ शिंगारे, पुणे | १,५०१ |
| २१३) श्री. किसन शंकर कथोरे, M.L.A | १,६०० | २१४) सौ. शिल्पा राजेंद्र वाडकर, कल्याण | १,५०१ |
| २१५) श्रीमती मायाबाई जगन्नाथ बागुल, नाशिक | १,५०० | २१६) श्री. सतिश केशव सोनवणे, शहादा | १,५०१ |
| २१७) श्री. ज्ञानेश्वर शंकर पाटणकर, कल्याण | १,५०१ | २१८) श्री. पंडित माधव साळी, एरंडोल | १,५०१ |
| २१९) सौ. ललिता पंडित साळी, एरंडोल | १,५०१ | २२०) श्री. राजकुमार दौलतराम देवकर, इंदौर | २,६०० |
| २२१) श्री. शरद खुशाल बोर्डे, विरार | १,५०० | २२२) श्रीमती लता अर्जुन निचळ, नाशिक | १,५०१ |
| २२३) श्रीमती वंदना परशुराम हावरे, गोरेगांव | १,५०१ | २२४) श्री. प्रकाश देवराम दाहोत्रे, पुणे | १,५०१ |
| २२५) सौ. हेमलता विजयकुमार साळी, मुलंड | १,५०१ | २२६) श्री. दिलीप मारोतराव ढोरजे, पुणे | १,५०१ |
| २२७) श्री. सुरेशचंद्र नारायण धारणकर, नाशिक | १,५०१ | २२८) सौ. शशिकला सुरेशचंद्र धारणकर, नाशिक | १,५०१ |
| २२९) श्री. अभिजीत जयंत साळी, मुलुंड | १,५०१ | २३०) सौ. दीपश्री धोंडू निमकर, ठाणे | २,१०० |
| २३१) श्री. रविंद्र गुलाबराव साळी (धरम), चाळीसगांव | १,५०१ | २३२) सौ. शशिकला रविंद्र साळी (धरम), चाळीसगांव | १,५०१ |
| २३३) श्री. प्रविण दत्तात्रय उपरे, पुणे | १,५०१ | २३४) श्री. प्रकाश मल्हारी बुलबुले, चोपडा | १,५०१ |
| २३५) श्रीमती शोभा भास्कर खंडारे, डोंबिवली | १,५०१ | २३६) श्रीमती सविता सत्यवान पाटील, भांडूप | १,५०० |
| २३७) श्री. देविदास गंगाराम डहाके, जळगांव | १,५०० | २३८) श्री. योगेश दत्तात्रय मते, पुणे | १,५०१ |
| २३९) श्री. एकनाथ रखमाजी पंडीत, नाशिक | १,५०१ | २४०) श्री. दिलीप गजानन हरवंदे, चिपळूण | १,५०० |
| २४१) श्री. शंकरराव दत्तात्रय गायकवाड, नाशिकरोड | १,५०१ | २४२) श्री. सुरेश विष्णु हेमाडे, वडगाव(बुद्रुक) | १,५०१ |
| २४३) श्री. सतीश एकनाथराव मांजरे, कल्याण | १,५०१ | २४४) श्री. प्रभाकर गुरुनाथ कापसे, कल्याण | १,०११ |
| २४५) श्री. अरुण रामकृष्ण धमाले, बदलापूर | १,५०१ | २४६) श्री. धनंजय गणपत जठार, खडपोली चिपळूण | १,००० |
| २४७) सौ. मंगला संभाजी ढवण, चिपळूण | १,५०१ | २४८) श्री. मल्लीकार्जुन तिप्पणा धोत्रे, गुलबर्गा (कर्नाटक) | १,५११ |
| २४९) श्री. हरिष मधुकर अष्टेकर, मुंबई | १,५०१ | २५०) श्री. दिपक सदाशिव जंत्रे, अंधेरी, मुंबई | १,५०१ |
| २५१) श्री. गजानन भिकू सागावकर, पेठमाप, चिपळूण | १,५०१ | २५२) श्री. विजय तुकाराम कांदेकर, बदलापूर/पुणे | २,००० |
| २५३) सौ. श्री. विनिता विजय कांदेकर, बदलापूर/पुणे | २,००० | २५४) श्री. देविदास तोताराम कलाणे, नागपूर | १,५११ |
| २५५) सौ. सुनिता विलास सरोदे, औरंगाबाद | १,५०१ | २५५) सौ. सुनिता विलास सरोदे, औरंगाबाद | १,५११ |



स्मृतीपुष्प

# स्वकुळ समाचार आधारस्तंभ

आपल्या दिवंगत प्रिय व्यक्तीच्या नावे रू. १,५०१ आधारस्तंभास देणगी देऊन
स्वकुळ समाचारच्या समाज सेवेत सहभागी व्हा.

७६४) कै. विनायक विष्णू दांडेकर, मुलुंड
७६५) कै. बाबुराव आसाराम सरोदे, औरंगाबाद
७६६) कै. सौ. कमलबाई प्रभाकर शेकटकर, शेवगांव
७६७) कै. प्रभाकर बाबुराव आढाव, कल्याण
७६८) कै. सुनंदा एकनाथ पावले, चिपळूण
७६९) कै. विलास रामचंद्र आंबुर्ले, डोंबिवली
७७०) कै. विजयकुमार बाबुराव घटे, अहमदनगर
७७१) कै रामचंद्र विष्णू मर्ढेकर, बदलापूर
७७२) कै. भास्कर गुलाब खंडारे, डोंबिवली
७७३) कै. गणपत निळकंठ सरोदे, भिवंडी
७७४) कै. रुक्मिणी गणपत सरोदे, भिवंडी
७७५) कै. शंकरराव गुणाजी साळी, डोंबिवली
७७६) कै. विजय शंकर वगद, ठाणे
७७७) कै. पुष्पलाल दत्तुशेठ क्षीरसागर, शहादा
७७८) कै. पंडित कन्हैयालाल चित्तेवान, धुळे
७७९) कै. भास्करराव सुखलाल बागडे, डोंबिवली
७८०) कै. सौ. अनुजा अरुण बागडे, डोंबिवली
७८१) कै. राहुल नंदकिशोर धरम (साळी), इंदौर
७८२) कै. किसनराव रघुनाथ पोकळे, अहमदनगर
७८३) कै. त्र्यंबकराव रामचंद्र येखे, अहमदनगर
७८४) कै. सौ. जयश्री दत्तात्रय मते, पुणे
७८५) कै. सुमनबाई लक्ष्मण धरम (साळी), एरंडोल
७८६) कै. सौ. शकुंतला एकनाथ पंडीत, नाशिक
७८७) कै. सौ. मनिषा मनोहर गोंधळेकर, चिपळूण
७८८) कै. सौ. शैला गोरखनाथ घोगे, बदलापूर
७८९) कै.सौ.शकुंतला माधवराव बंबाळे, चांदवड
७९०) कै. काशिनाथ रघुनाथ सातपुते, ठाणे
७९१) कै. श्रीमती शांताबाई माधवराव दिवटे, सुरत
७९२) कै. शंकरराव नारायण वांद्रे, पुणे
७९३) कै. मच्छिंद्रनाथ सिताराम साळी, पुणे
७९४) कै. सौ. पुष्पा सुरेश अष्टेकर, अहमदनगर
७९५) कै. सौ. वसुधा शशिकांत गोंधळेकर, डोंबिवली
७९६) स्वा. सै. कै. एकनाथराव गो. मांजरे, वैजापूर
७९७) कै. मनोहर बाबा गोंधळेकर, चिपळूण
७९८) कै. गोपाळराव झिपरु लांडगे, डोंबिवली
७९९) कै. श्रीमती मनोरमा गोपाळ लांडगे, डोंबिवली
८००) कै. श्रीमती शकुंतला पु. दिवाणे, उल्हासनगर
८०१) कै. बालाजी लक्ष्मण ढवण, भिवंडी
८०२) कै. श्रीमती विमलबाई खेमचंद साळी, शहादा
८०३) कै. श्रीमती सावित्रीबाई नरहर पुरे, नाशिकरोड
८०४) कै. किसन त्र्यंबक ढवण, विंचूर
८०५) कै. रुख्मिणीबाई किसनराव ढवण, विंचूर
८०६) कै. पुरुषोत्तम श्रावण वाव्हळ, पुणे
८०७) कै. श्रीमती राधाबाई काशिनाथ साळी, खंडवा
८०८) कै. सौ. अंजना रामचंद्र घोले, ठाकुर्ली(डोंबिवली)
८०९) कै. काशिनाथ बळवंत डांगरे, इचलकरंजी
८१०) कै. कोंडाबाई काशिनाथ डांगरे, इचलकरंजी
८११) कै. गणपत बळवंत डांगरे, इचलकरंजी
८१२) कै. अनुसया गणपत डांगरे, इचलकरंजी
८१३) कै. गोपीनाथ दत्तात्रय ढवण, विंचूर
८१४) कै. लक्ष्मण सहदेव सरोदे, नाशिक
८१५) कै. श्रीमती शकुंतला या. कासटकर,उल्हासनगर
८१६) कै. वसंतराव मुरलीधर अष्टेकर, मुंबई
८१७) कै. तानीरामशेठ हिरामणशेठ बडकस, कुरंगीकर
८१८) कै. गं. भा. सोनाबाई ता. बडकस,कुरंगीकर
८१९) कै. हिरामणशेठ सखारामशेठ कापरे, एरंडोल
८२०) कै. आवडाबाई हिरमणशेठ कापरे, एरंडोल
८२१) कै. नारायणराव वंजीलाल बाळदे, सिन्नर
८२२) कै. गं. भा. राधाबाई ना. बाळदे, सिन्नर
८२३) कै. विठ्ठलशेठ हिरामणशेठ कापरे, एरंडोल
८२४) कै. सौ. वारुबाई विठ्ठलशेठ कापरे, एरंडोल
८२५) कै. सौ. मीरा बारसु सिताफळे, डोंबिवली
८२६) कै. हणमंतराव शंकरराव महादार, रत्नागिरी
८२७) कै. वसंतराव रघुनाथ साळी (सातपुते), कळवा
८२८) कै. मनोरमा रघुनाथ पाटणकर, डोंबिवली
८२९) कै. रमेश गणपत खेडकर, डोंबिवली
८३०) कै. अवंतिका ज. खडमकर, नाशिक
८३१) कै. सदाशिव अनंत जंत्रे, अंधेरी, मुंबई
८३२) कै. कु. छाया सदाशिव जंत्रे, अंधेरी, मुंबई
८३३) कै. सोनू खंडू वाझट, सुरत
८३४) कै. मथुराबाई बाबूराव झडप, विंचूर, नाशिक
८३५) कै. मधुकर भिकू सागावकर, पेठमाप, चिपळूण
८३६) कै. सुरेश माधवराव साळी, नेरुळ, नवीमुंबई
८३७) कै. श्रीकृष्ण नथू साळी (सर), पवई, मुंबई
८३८) कै. सौ. सुनिता प्रकाश भागवत, बदलापूर
८३९) कै. सुकलाल बाजीराव थोरात (साळी)अंबरनाथ
८४०) कै. सौ. गंगूबाई सुकलाल थोरात (साळी)अंबरनाथ
८४१) कै. प्रदीप मधुकर कांबळे, कळवा, ठाणे
८४२) कै. सौ. विजया सुरेश कासटकर, मनमाड
८४३) कै. सोनाबाई व कै. त्रिंबकराव भाऊराव दळवी, पुंडी, आष्टी, बीड
८४४) कै. प्रभाकर (बापू) शंकर गोंधळेकर, मुलुंड मुंबई
८४५) कै. राजेश प्रताप सरोदे, कोपरी, ठाणे
८४६) कै. विद्या अनंत साळी, नवी मुंबई
८४७) कै. सृष्टी आनंद ओहोळ, लासलगाव
८४८) कै. सतिष सुर्यकांत बागडे, अ. नगर
८४९) कै. सौ. सुशिलाबाई कन्हैयालाल काळे, ठाणे
८५०) कै. श्री. प्रभाकर शंकर गोंधळेकर
८५१) कै. गं.भा. कल्पना मेघश्याम धमके, मुंब्रा

**कै. सुर्यकांत (भाई) गोपीनाथ भागवत, मुलुंड यांच्या स्मरणार्थ**
**श्रीमती सुप्रिया सुर्यकांत भागवत, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

# एकसष्ठी सोहळा

***दिवस आजचा घेऊन यावा नवा हर्ष आणि विश्वास,***
***शुभ इच्छांचा व कौतुकाचा सोहळा आणि शुभ मधुमास.***







**रेखाताई तुझ्या आयुष्यात घ्यावा दुःखाने संन्यास, समृद्धीच्या आनंदाच्या वाटेवर व्हावा तुझा सुखाचा प्रवास.**

अशी आमची रेखाताई पण सर्वांचीच आत्या. तिने दिनांक २२/०५/२०२४ रोजी वयाची ६१ वर्षे पूर्ण करून ६२व्या वर्षात पदार्पण केले. त्यावेळी तिचा ६१ वा वाढदिवसासाठी सर्व आप्तेष्ट, परिवार, मित्र-मैत्रिणी सोबत पुर्णिमा हॉलमध्ये आनंदात पार पडला. तिच्या दोन्ही भाच्या म्हणजे रसिका व स्नेहल म्हणतात 'सागरासारखी अथांग माया भरलीय रेखा आत्या तुझ्यात, आमच्या हृदयात कधीकधी तर तू आम्हाला आईच वाटतेस, हळवी असलीस तरी कठीण प्रसंगी खंबीर होऊन बळ देतेस, चुकलं तर वेळप्रसंगी कानही धरतेस.आमच्यावर काळजी वाहू वेड्यासारखं प्रेम करणाऱ्या, उंचीने लहान असणाऱ्या पण प्रेमाने महान असणाऱ्या, सर्वांपेक्षा वेगळी, प्रेमळ, आमच्यासाठी तर आमचे सर्वस्व, मनाने दिलदार अशी आमची रेखा आत्या. आत्याला तिच्या ६१ व्या वाढदिवसाच्या दिवशी आम्हाला असे काहीतरी द्यायचे होते जे अगदी अस्मरणीय आणि अदभूत असेल पण लगेचच लक्षात आलं की आमच्या रेखाआत्या इतकं सुंदर आणि अदभुत असं काहीच असू शकत नाही. आमची रेखा आत्या सर्व गुणांनी परिपूर्ण, निर्मळ झऱ्या सारखी, सतत दुसऱ्यावर प्रेमाचा वर्षाव करणारी, काळजीवाहू, स्वतःला विसरून नेहमीच दुसऱ्याचा विचार करणारी, प्रेमळ, सोज्वळ, खूप कष्टाळू, खूप मेहनती अशी आमची सर्वांचीच लाडकी.

'व्हावीस तू शतायुषी, व्हावीस तू दीर्घायुषी ही एकच मनी इच्छा आहे, तुझ्या पुढील जीवनासाठी.'

खरं तर रेखाताई तू कधीच मोठेपणाचा हव्यास केला नाहीस. मोठेपणा दाखवला नाही. नेहमीच तू 'कमी तेथे मी 'हे प्रत्यक्ष करून दाखवलंस. सामाजिक कार्याला वाहून घेतलंस. रेखाताई तुझ्याविषयी जेवढे लिहू तेवढे कमीच आहे.

अशा माझ्या प्रेमळ बहिणीला ६१व्या वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा. रेखाताई तुला तुझ्या सर्व बहिणीकडून, भाऊ-वहिनींकडून, भाचे-भाच्या, सुना,नातवंड, जिवलग मित्र- मैत्रिणी यांच्याकडून खूप खूप शुभेच्छा. तसेच स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था व ठाणे जिल्ह्याचे पदाधिकारी त्याचप्रमाणे तुझे हितचिंतक यांनी तुझ्या वाढदिवसाच्या दिवशी प्रत्यक्ष हजर राहून प्रेमरूपी शुभेच्छा दिल्यात. वडिलांच्या संस्काराची शिदोरी कधी सांडू नकोस. रेखाताई तुला पुन्हा एकदा सर्व परिवाराकडून खूप खूप शुभेच्छा.

***तुझीच बहीण - मनीषा देवकर, बदलापूर***

**-: शुभेच्छुक :-**

**श्री अरुण चं. दिवटे सौ.स्मिता अरुण दिवटे श्री. अनिल चं. दिवटे श्री.प्रवीण चं. दिवटे सौ.मनीषा प्र. दिवटे**
**श्रीमती संजीवनी र. दिवटे समस्त दिवटे आणि देवकर परिवार**

**कै. भागीरथी रामचंद्र दळवी व कै. रामचंद्र मारुतीराव दळवी, पुणे यांच्या स्मरणार्थ**
**स्वकुळ रत्न श्री. जनार्दन रामचंद्र दळवी, पुणे यांच्य सौजन्याने पृष्ठदान.**

## ‘याच्यासाठी त्याच्यासाठी’

याच्यासाठी त्याच्यासाठी . नुसताच पळत होता ,
ते गेले घरी निघून , हा एकटाच जळत होता ......

जिवनाचा खरा अर्थ कळायचा असेल तर स्मशानात चक्कर मारली पाहीजे,,,

कारण स्मशानभूमीत प्रेत एकटेच जळत होते ते पाहून असंख्य प्रश्नांनी मनात एकच गदारोळ उत्पन्न केला होता....

हेच ते प्रेत जिवंत असताना माझेमाझे करत असेल, एक एक रुपयासाठी झगडत असेल, मोह - माया - काम - क्रोध - मत्सर यांना घेऊन समाजात जगत असेल, आरे ला कारे करणारा देह , आज मात्र जळतोय शांत, स्तब्ध, एकाकी तरीही शांतपणे पडून स्वतःला जाळून घेतोय..

जीवलगांनी त्यांच्यासाठी जीव लावला. ते आज ओक्साबोक्षी रडले. घरा पासून स्मशानभूमी पर्यंतच सोबती झाले-खरे; परंतु विधी संपताच त्यांनी घराचा रस्ता धरला. घरी जाऊन त्यांनी सुद्धा कडू घास काढण्यासाठी दोन चार घास पोटात घातले असतील, आज दोन चारघास पण उद्या पासून पोटभर अन्न खातील ते.

जमवलेल्या लाखो रूपयाच्या संपत्तीपैकी फक्त फुटका रूपया मुखात आलाय, जीवनात १०० एकर जमिनीच्या तुकड्याला खरेदी केले, तरीही जाळायला नेले स्मशानभूमीतील एकाकी घाटावर, अलिशान बंगल्यामध्ये छानसा सुंदर तयार केलेला बाथरूम, तरीही शेवटची आंघोळ ही त्यात नव्हती, तर ती होती फक्त आणि फक्त घरा समोरील रस्त्यावर आयुष्यभर ज्या साठी झगडला, त्यातील एक गोष्ट सुध्दा बरोबर नव्हती.

जळताना - ना प्रेम करणारे जिवलग, ना नातेवाईक, ना सगे सोयरे, ना करोडोची संपत्ती.

अरे अरे.... तरीही तो आयुष्यभर खोट्या गोष्टीचा मोह धरून पळत राहिला.... ही खंत तर नसेल वाटत त्या जळणाऱ्या प्रेताला...?

समाज बंधुंनो....!

आत्मप्रौढी, स्वतःचा मोठेपणा, दुस-याबाबत आकस, समोरच्याला कमी लेखण्याची हीन मनोवृत्ती, गर्वाची भाषा, अहंपणाचा महामेरू ही जीवनातील -हासाची कारणे सोबत असतील तर जीवन कदापि सुंदर होणार नाही

चला.... जीवन सुंदर बनविण्यासाठी काम- क्रोध-लोभ-मत्सररूपी लक्षणांना दूर ठेऊन जीवनात किती ही मोठेपद, प्रतिष्ठा, यश मिळाले तरी अहंकार रूपी सैतानाला दूर ठेऊ या....

प्रेमळ-आनंदी-सर्वांचा आदर-आधार......म्हणून माणूस बनू या....!

***संग्रहीत - श्री. ईश्वरलाल साळी***

## मी पावसाला विचारलं

मी पावसाला विचारलं
तुझं वय काय?

पावसानं मला सुंदर उत्तर दिलं..

जर तू पावसात सैर वैरा
आनंदात धावत असशील
तर माझं वय १०

जर तू पावसात
कविता लिहित असशील
तर माझं वय १६

जर तुला पावसात
विरह जाणवत असेल
तर माझं वय १८

जर तुला पावसात
ट्रेकिंग ला जावंस वाटत
असेल तर माझं वय २४

जर तुला पावसात
गजरा घ्यावासा वाटत असेल
तर माझं वय ३०

जर तुला मित्रां सोबत
पावसात भिजत भजी
खावी असं वाटत असेल
तर माझं वय ४०

मग मी पावसाला म्हणालो,

अरे एक काय ते वय सांग,
शब्दात गुंतवू नकोस!

पाऊस स्मितहास्य देऊन म्हणाला,

पाऊस तू जसा अनुभवशील
तेच माझे वय!!

मैत्री ही अशीच असते तिला वयाचे बंधन नसते..

संग्रहित श्री.गोपाल थोरात

कै. तुकाराम लक्ष्मण घोंगे व कै. सुशिला तुकाराम घोंगे, बोरीवली तसेच
कै. सिताराम लक्ष्मण घोंगे व कै. सौ. इंदिरा सिताराम घोंगे (लोअरपरेल) यांच्या स्मरणार्थ पृष्ठदान.

# एक अप्रतिम कथा!!

तो वाळवंटात चुकला होता. त्याच्या जवळच पाणी संपलं.. त्यालाही दोन दिवस झाले होते. आता पाणी नाही मिळालं तर आपलं मरण निश्चित आहे हे त्याला दिसत होतं, जाणवत होतं. हताश होऊन तो सभोवताली दूर दूर पर्यंत जेवढी नजर जाईल तिथपर्यंत डोळे ताणून ताणून पहात होता. त्याची नजर अर्थातच पाणी शोधत होती. तेवढ्यात त्याला काही अंतरावर एक झोपडं दिसलं. तो थबकला. ..हा भास तर नाही? नाहीतर मृगजळ असेल.

पण काही असो, तिकडे जाऊया, काही असेल तर मिळेल असा विचार करत पाय ओढत स्वतःच थकलेलं शरीर घेऊन तो निघाला. काही वेळातच त्याच्या लक्षात आले की तो भास नव्हता, झोपडी खरोखरच होती. पण ती रिकामी होती, कोणीच नव्हतं तिथे आणि ती तशी बऱ्याच दिवसांपासून, कदाचित वर्षांपासून असावी असं वाटत होतं.

पाणी मिळेल या आशेने तो आत शिरला. ..

आणि समोरच दृष्य पाहून तो थबकलाच.

माणूस मागतो एक डोळा आणि देव देतो दोन अशी त्याची स्थिती झाली.

तिथे एक हातपंप होता आणि त्याचा पाईप जमिनीत शिरला होता. त्याच्या लक्षात आलं जमिनीखाली पाणी आहे. हा पाईप तिथेच गेलाय. त्याच्या अंगात एकदम उत्साह संचारला. ..पुढे सरकत त्याने हातपंप जोराजोरात वरखाली करायला सुरवात केली. पण काहीच झालं नाही. पाणी आलं नाही. नुसताच पंपाचा आवाज येत राहिला. अखेर हताश होऊन तो मटकन खाली बसला. आता आपलं मरण त्याला जास्त प्रकर्षाने जाणवले.

तेवढ्यात त्याचं लक्ष कोपऱ्यात ठेवलेल्या बाटलीकडे गेलं. परत एक अत्यानंदाची लहर उठली. बाटली पाण्याने भरलेली होती आणि वाफ होऊन जाऊ नये म्हणून व्यवस्थित सिल केलेली होती. चटकन त्याने पाणी पिण्यासाठी बाटली उघडली ..तेवढ्यात बाटलीवर लावलेल्या एका कागदाकडे त्याचे लक्ष गेले.

त्यावर लिहिले होते 'हे पाणी पंपात ओता..पंप सुरू करण्यासाठी वापरा आणि तुमचं काम झाल्यावर ही बाटली परत भरून ठेवा.'

तो चक्रावलाच. त्याच्या मनात द्वंद्व सुरू झालं. काय करावं?

या सुचनेकडे दुर्लक्ष करून सरळ पाणी पिऊन मोकळं व्हावं? की सुचनेप्रमाणे करावं?

To be or not to be.?

समजा, सूचनेप्रमाणे पंपात पाणी ओतलं आणि पंप खराब असेल तर?, पंपाचा पाईप तुटला असेल तर?, खालचं पाणी आटून गेलं असेल तर? पाणी वायाच जाईल... सगळा खेळ खल्लास...

पण सुचना बरोबर असेल तर?... तर भरपूर पाणी...

पाणी पंपात ओतण्याचा धोका पत्करावा की नाही यावर त्याच मत ठरेना.

शेवटी मनाचा निर्धार करत थरथरत्या हातांनी त्याने ते पाणी पंपात ओतले. डोळे मिटून देवाचा धावा केला आणि पंप वरखाली करायला सुरवात केली. हळूहळू पाण्याचा आवाज सुरू झाला आणि काही क्षणातच पाणी यायला सुरवात झाली. भरपूर पाणी आलं.. त्याला काय करू नी काय नको असं झालं. ढसाढसा पाणी प्यायला ..स्वतः जवळच्या बाटल्या काठोकाठ भरल्या त्याने. तो खुप खुश झाला होता.

शांत आणि पाण्याने तृप्त झाल्यावर त्याचे लक्ष दुसर्या कागदाकडे गेले. तो त्या परिसराचा नकाशा होता. त्यावरून लक्षात आलं की तो मानवी वस्तीपासून खुप दूर होता. पण आता निदान त्याला त्याच्या पुढच्या प्रवासाची दिशा तरी समजली होती. त्याने निघायची तयारी केली. सुचनेप्रमाणे ती बाटली भरून सिलबंद करून ठेवली.

आणि त्या बाटलीवरच्या कागदावर एक ओळ स्वतः लिहीली. 'विश्वास ठेवून हे पाणी पंपात ओता..पाणी येतंच'

आणि तो पुढे निघाला.

ही गोष्ट आहे देण्याचं महत्व सांगणारी आहे. काही मिळवण्यासाठी काही द्यावं लागतं हे अधोरेखित करणारी. काही दिल्यानंतर मिळतं ते भरपूर असतं, आनंददायी असतं. त्याही पेक्षा जास्त प्रकर्षाने ही गोष्ट विश्वासाबद्दल सांगते. विश्वासाने केलेले दान खुप आनंद देते. खात्री नसतानाही त्याने विश्वास दाखवला, या गोष्टीतले पाणी म्हणजे आयुष्यात घडणाऱ्या चांगल्या गोष्टी त्यांच्याकरता वेळ द्या आणि त्याच्या बदल्यात कितीतरी जास्त पटीने आनंदाची झोळी भरून घ्या.

कै. श्री. मनोहर रामचंद्र सरोदे व कै. श्रीमती उषा मनोहर सरोदे (डोंबिवली) यांच्या स्मरणार्थ
सौ. अनुप्रिया शंतनु कोळेकर (मुलगी) व श्री. सरोदे बंधू डोंबिवली यांच्य सौजन्याने पृष्ठदान.

# पत्नी नावाची जिवंत देवी....

बायको जर नसेल तर
राजवाडा पण सुना आहे
बायकोला नावं ठेवणे हा
खरंच गंभीर गुन्हा आहे !!
खरं पाहिलं तर तिच्याशिवाय
पानही हालत नाही.....
घरातलं कोणतंच सुख
बायको शिवाय फुलत नाही !!
नोकरी अन पगाराशिवाय
नवऱ्याजवळ आहे काय ??
तुलनाच जर केली तर
सांगा, तुम्हाला येतं काय ??
स्वच्छ, सुंदर,पवित्र घर
बायकोमुळेच असतं.....
नवरा नावाचं विचित्र माणूस
तिलाच हसत बसतं !!
वय कमी असून सुद्धा
बायको समजदार असते...
बायकोपेक्षा नवऱ्याचे वय
म्हणूनच जास्त असते !!
तिचा दोष काय तर म्हणे
चांगल्या सवयी लावते !!
कुटुंबाच्या कल्याणासाठी
दिवस रात्र धावते !!
चिडत असेल अधून मधून
सहनशीलता संपल्यावर;
तुम्हीच सांगा काय होणार
चोवीस तास जुंपल्यावर ??
बायकोची टिंगल करून
फिदी फिदी हसू नका.....
तिच्या यादीत मूर्ख स्थानी
नंबर एक वर बसू नका.....
बायको म्हणजे अंगणातला
प्राजक्ताचा सडा !!
बायको म्हणजे पवित्र असा
अमृताचा घडा !!
बायको म्हणजे सप्तरंगी
इंद्रधनुष्य घरातलं !!
देवासाठी गायलेलं
भजन गोड स्वरातलं !!
नवरोजी बायकोकडे
माणूस म्हणून पहा.....
तिचं मन जपण्यासाठी
थोडं शांत रहा.....
कधीतरी कौतुकाचे
दोन शब्द बोलावे
तिच्या वाट्याचे एखादं कामं तरी
आनंदाने झेलावे !!

**घरासाठी झटणाऱ्या सर्व गृहिणींना मनापासून समर्पित**

## वात्रटिका

### मजेशीर कविता

बशी म्हणाली कपाला
श्रेय नाही नशिबाला
पिताना पितात बशीभर
अन म्हणताना म्हणतात कपभर...!
कप म्हणाला बशीला
तुझा मोठा वशिला
धरतात मला कानाला
अन् लावतात तुला ओठाला...!!!

कै. सौ. प्रभावती अंबादास साळी (सासुबाई) व कै. सौ. सुशिलाबाई मधुकर साळी (आई) यांच्या स्मरणार्थ सौ. विनिता विवेकानंद साळी, कल्याण यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## अभिनंदन



**सोलापूर** - श्री. धनंजय तरटे यांची कन्या कु. साक्षी तरटे हिने दिल्ली येथे १७ ते १९ मे २०२४ दरम्यान झालेल्या पहिल्या स्वदेशी राष्ट्रीय स्तरावरील सरित सराक (कराटे) प्रतियोगिता २०२४ यामध्ये रौप्य पदक प्राप्त केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.



**इचलकरंजी (कोल्हापूर)** - येथील युवा समाज बांधव सहायक पोलीस निरीक्षक श्री. विकास बडवे यांची पदोन्नतीने पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती झाली.



**घोटवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर** येथील युवा समाज बांधव श्री. राहूल रंगराव बोंद्रे यांची पोलीस निरिक्षक या पदावर पदोन्नती झालेबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.



**सांगली** - श्री. प्रशांत साळी साहेब यांची उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (Dy. RTO) म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिख शुभेच्छा.



**धाराशिव** - साळी युवा समाजबांधव श्री. गजेंद्र सरोदे यांची पदोन्नतीने धाराशिव जिल्हा पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक पदावर निवड झालेबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**ओगलेवाडी कराड** येथील जेष्ठ समाज बांधव श्री. मोहन पाढंरपट्टे यांचा नातू चि. आशय सोमदत्त पांढरपट्टे यांची भारत सरकारच्या रिसर्च संस्था, पुणे (IISER) च्या सीडॅकमध्ये संशोधक म्हणून निवड झालेबद्दल अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**डोंबिवली : कुमारी चिन्मयी मोहन हट्टी** हिला दहावीच्या परीक्षेत ९६ॾ मिळाले. खूप खूप अभिनंदन.

**जळगाव : कुमारी तनिष्का दत्तात्रय साळी हिला**



१२ वी च्या परीक्षेत ८४%, MHCET परीक्षेत ९९.५८%, JEE Mains ९६.७७% , JEE Advance = AIR - ३९३३ (OBC Category Rank)



**कुमार आराध्य ज्योती सुनिल देवकर** JEE Advance Exam. १७७० Category Rank

तिघांचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्था व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप शुभेच्छा



# गुरु तेथे स्वार्थ सुरू....

गुरुपौर्णिमा या शब्दाला फार महत्त्व तर आहेच शिवाय या दिवसाला ही महत्त्व आहे या दिवशी गुरूंच्या घरी जाऊन त्यांचे आशीर्वाद घ्यायचे व त्यांचे आशीर्वादपर विचार ऐकून पुढे जाण्यासाठी आपल्या जीवनाची योग्य दिशा ठरवून सुख समाधान ऐश्वर्य प्राप्त करून घ्यायचे असते अशी परंपरा अनेक वर्ष चालू आहे. त्याप्रमाणे आपण फक्त परंपरा व अनुकरण एवढेच करतो तो काळ व आताचा काळ यामध्ये खूप फरक पडला आहे पण विचार करण्याचे सोडल्यामुळे सध्या आपण नाही त्या गुरुकडे जाऊन आपला वेळ वाया घालवित आहोत पूर्वी गुरुचे महत्व होते गुरुही ज्ञानाने व आचरणाने सामर्थ्यवान होते. शिस्त होती पैशाचा खेळ नव्हता.

आज गल्ली बोळात गुरूंचे पीक वाढले आहे चार भक्त जमा करायचे आणि त्यांच्याकडून स्वतःला गुरु म्हणून घ्यायचे. थोडा भपकेपणा करायचा व आपले स्थान बळकट करायचे असे प्रकार सुरू झाले आहेत घरी येणारे लोक वाढले व महिलांची संख्या वाढली की त्यांना लुबाडणे, गुरुदक्षिणेच्या नावाखाली भेट वस्तू मागणे,त्या जमा करून आपले घर भरणे हा उद्योग सुरू झाला आहे. गुरूंनी दक्षिणा मागायची नसते पण हल्ली भामटे गुरु दक्षिणा मागतात. ते शिष्यांच्या उद्धार ते काय करणार? हे लोकांना केव्हा समजणार.खरे गुरु सामान्य भक्तांसाठी चांगले मार्गदर्शन करतात ते मनाने व परिस्थितीने मोठे असतात कोणालाही काहीही मागत नाहीत. जर समोर काही जमले असेल तर ते तेथे जमलेल्या इतरांना देऊन संपवतात. ज्ञानी गुरु भविष्य सांगत नाहीत. अंगठी,यंत्रे न देता सोप्या भाषेतून मार्गदर्शन करतात. भक्तांना जीवन मुक्तीचा मार्ग दाखवतात. उपासनेद्वारे जीवन बदलण्याच्या संदेश देतात.ज्ञानवंत गुरूंच्या वाणीत ताकद जाणवते, जिवाळा वाटतो. त्यांच्या दृष्टीत,संकल्पात गोरगरीब भक्तांच्या जीवनाबद्दल आपलेपणा दिसतो. सध्या परिस्थीती पूर्ण बदलली आहे. ज्याकडे काहीही नाही अशा गुरूंच्या घरी गर्दी वाढत चालली आहे.

सध्या गुरुपौर्णिमा म्हणजे गेट-टुगेदर झाले आहे. या दिवशी गुरूंच्या घरी अथवा मंदिर अथवा हॉलमध्ये भपकेपणा वाढत चालला आहे. गर्दी,हार,पेढे, भामट्या गुरूंच्या दर्शनासाठी दोन-तीन तास रांगा, महिलांसाठी स्वतंत्र्य व्यवस्था, रात्री गाण्याच्या कार्यक्रम, एकत्रित मोठे जेवण वगैरे वगैरे या प्रकारात गुरु शिष्यांचे नातं दिसत नाही. पैशाचा खेळ व चावटपणा लक्षात येतो. पैशाला चटवलेल्या गुरूला ५०० ते १००० रुपयाच्या नोटांच्या माळा गळ्यात घातल्या जातात,सोनं भेट दिले जाते यामुळे गुरुपौर्णिमा या दिवसाचे पावित्र्य नाहीसे होत चालले आहे या दिवशी वासुदेवाचे दर्शन घडण्याऐवजी वासनाच जाणवते. स्वतःचा उदो उदो करून हे भंपक गुरु देवांपेक्षा स्वतःची व्यक्ती पूजा वाढवत आहे खरे तर देवापेक्षा कोणीही मोठे नाही स्वतःच्या फोटो मागे व शेजारी देवांचे फोटो प्रसिद्ध करून आपले महत्त्व वाढवण्याचा प्रयत्न करतात. विचारी माणसाला वरून कीर्तन व तेथील प्रकार पाहून वासनाच जाणवते तेथे जमलेले शिष्य वर्षानुवर्ष सुधारलेले दिसत नाही मात्र गुरुबाबा, त्यांची पत्नी व मुलांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली दिसते. ज्या गावात देवाची पालखी अथवा पादुका येतात त्यांच्या दर्शनाला जाणाऱ्यांमध्ये फरक पडत नाही मात्र जे घेऊन येतात तेच दिवसेंदिवस आर्थिक परिस्थितीने सुधारत असतात.

पूर्वी गुरु शिष्य नाते होते. गुरु, गुरुकुल गुरुपरंपरा होती. गुरु हा सामान्य जनता व परमेश्वराला जोडणारा मोठा दुवा आहे. शारीरिक, आर्थिक परिस्थितीने जे खचले आहेत त्यांच्या जीवनाची दशा झाली आहे, त्यांना गुरुने चांगली वाट दाखवायची असते,परंतू भंपक व स्वार्थी गुरु वाट दाखवायच्या ऐवजी त्यांची उरलीसुरली वाट लावून टाकतात. खरंतर गुरुचा आधार फार मोठा आहे. परमेश्वराचे दर्शन व कृपा होण्यास वेळ लागेल पण गुरूंकडे गेल्यावर जीवन जगण्याला नवी दिशा, मार्गदर्शन व हिम्मत मिळायला हवी पण घडते काय, वेळ पैसा जाऊन स्वतःची व कुटुंबाची बरबादी होते. ताण-तणाव कमी होण्याऐवजी तो वाढत जातो,वाईट अनुभव येऊन सुद्धा गुरूंच्या व त्यांच्या शिष्यांच्या अरेरावीमुळे गप्प बसावे लागते.भामटे गुरु स्वामी महाराजांसारखा, इतर संतांसारखा पेहराव करून आपणास लुबाडण्यासाठी वाट पाहत असतात. प्रत्यक्ष गुरु स्वामी-समर्थांना वाटत असेल कलियुगातील भक्तांना तारण्यासाठी मी अवतार घेतला

असून सुद्धा मला नामस्मरणाने हाक मारण्याऐवजी हे भक्त वत्सल नाही त्याच्याकडे का जात आहेत. केव्हा सावध होणार? केव्हा जिवनाचा उद्धार करून घेणार?

गुरुशिवाय गती नाही म्हणून गुरु करण्याचे सर्वत्र घाई चालली आहे. गुरु शिवाय गती नाही असे म्हणणाऱ्यांची बुद्धी मंद झालेली आहे. विवाहाशिवाय मोक्ष नाही म्हणून कोणत्याही व्यसनी पुरुषाच्या गळ्यात माळ घालून चालेल का? घरातील कोणीही हे धाडस करणार नाही. बिचा-या त्या महिलेच्या जिवनाची गती होण्याऐवजी तिच्या संसाराची मातीच होईल. बाजारात कोणत्याही वस्तूंची खरेदी करतांना आपण किती चौकशी करतो पण गुरु न तपासता त्याची विश्वासार्हता न जाणता त्याच्या आहारी जातो. कोणालाही गुरू करून कसे चालेल, ते दिवस गेले प्रत्येकाने सावध राहायला हवे.व्रत वैकल्ये, कानात मंत्र, गळ्यात माळ, देणारे वगैरे वगैरे विविध प्रकार सांगणाऱ्या गुरूंचे पीक वाढत चालले आहे. आपण त्यांच्या कचाट्यात सापडलं की सुटका नाही. वेळ, पैसा,अब्रूची बेअब्रु झालीच समजा.

हल्लीच्या अनेक गुरूंना परमार्थाचा गंध नाही. भवगवे कपडे, गंध लावले व माळ घातली की झाले गुरुस्थान. यांच्या जवळ वावरणाऱ्या काही महिला व पुरुष हेरगिरी करून भक्तांना भीती दाखवून गुरुंकडे सतत निमंत्रित करतात व गुरु सोडला तर पाप लागेल असे सांगतात. त्यांच्याकडे विद्यामंत्र आहे वगैरे वगैरे. खरे तर या गुरूंकडे शक्ती व भक्तीही नसते फक्त देखावाच असतो. गुरूंच्या घरी व श्रमात हेलपाटे घालून श्रवण अथवा वाचन बोध होत नाही. वेळ वाया जातो, वेळ गेल्यावर कळते की या भामट्या गुरुचा काडीचाही आधार नव्हता. म्हणून अजूनही वेळ गेलेली नाही. गुरु तपासून पहा, माहिती घ्या,आणि त्यांच्या संपर्कात असणाऱ्यांची माहिती घ्या. साधकाचे मनापासून चांगले व्हावे असे वाटत असणाराच गुरुच शोधा. तुम्ही स्वतः स्वतःचे गुरुवार तुमचे घर गुरुचे मंदिर करा भले तुमच्या घरच्या मंदिरात गुरु व शिष्य असे तुम्ही दोघेच असला तरी श्रीपाद वल्लभ श्री नृसिंह सरस्वती व श्री स्वामी महाराजांना गुरु करा हेच कलियुगाची तार आहे

**मासिक अक्कलकोट स्वामी दर्शन आधारीत**
**लक्ष्मण लोणकर-९८५०१३२१६८**

**महत्व :**

**केळी :** केळी मध्ये व्हिटॅमिन बी 6 आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. जे तुम्हाला अन्न सहज पचण्यास मदत करते. तसेच पोटदुखी कमी होण्यास मदत होते. यामुळे जर पोट दुखत असेल तर केळीचे सेवन करा.

**लिंबू :** कोमट पाण्यात लिंबाचा रस मिसळून प्या. यामुळे पोट दुखणे बंद होईल. लिंबूमध्ये आम्लीय गुणधर्म असतात. तसेच हे पोटातील साठलेला गॅस कमी होण्यास मदत करते.

**आद्रक :** आल्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. त्यात अँटीऑक्सिडंट असतात जे फ्री रॅडिकल्स कमी करतात. हे वेदना कमी करू शकते.

**पुदिना :** पुदिना पचनास मदत करते. ज्यामुळे वेदना कमी होतात. हे मळमळ बरे करू शकते. यामुळे पोटदुखीमध्ये आणि मळमळ होत असेल तर पुदिन्याचे सेवन करा.लवंगचे सेवन केल्याने तुम्ही वेदना आणि अपचन दूर करू शकता. हे मळमळ, उलट्या, गॅस कमी करण्यास मदत करते.पोटाच्या दुखण्यावर फायदेशीर आहे. वेदनेपासून त्वरित आराम मिळेल.

**दालचिनी :** दालचिनीमध्ये अनेक अँटिऑक्सिडंट्स असतात जे पचनक्रिया सुधारतात. ओटीपोटात दुखत असल्यास एक दालचिनीचा एक तुकडा चघळा. याने तुम्हाला बरं वाटेल.

**तुळस :** तुळशीमधील औषधी गुणधर्म गॅस कमी करू शकतात, भूक वाढवू शकतात, पेटके दूर करू शकतात आणि संपूर्ण पचन सुधारू शकतात. तुळशीमधील युजेनॉल पोटातील ॲसिडचे प्रमाण कमी करते.

**नारळ-पाणी:**पोटात दुखत असल्यास दर 4 ते 6 तासांनी दोन ग्लास नारळाचे पाणी हळू हळू प्यावे.

**अंजीर :** पोटात दुखत असल्यास दिवसातून काही वेळा संपूर्ण अंजीर फळ खाण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला वेदनेपासून मुक्ती मिळण्यास मदत जोते.

**लिंबू पाणी :** ओटीपोटाच्या दुखण्यावर लिंबू पाणी हा एक उत्तम पर्याय आहे. लिंबाचा अल्कधर्मी प्रभाव पोटातील अतिरिक्त आम्लता शांत करण्यास मदत करतो.

**जिरे :** पोटाच्या दुखण्यावर घरगुती उपाय म्हणून हा एक उत्तम पर्याय आहे. हे हायपर ॲसिडिटी, ओटीपोटात वायू कमी होण्यास मदत होते एक लहान चमचा जिरे चावून खाणे व त्यावर पाणी पिणे


कै. श्री. करिअप्पा बुध्दिवंतअप्पा गच्ची व कै. श्रीमती गंगम्मा करिअप्पा गच्ची,
गदग-बेटगेरी (कर्नाटक) यांच्या स्मरणार्थ डॉ. गोपाळकृष्ण कदिअप्पा गच्ची, डोंबिवली यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## भावपूर्ण आदरांजली



**सुरत :** श्री प्रमोद मधुकर सातपुते यांची धर्म पत्नी स्व. सुनीताबाई प्रमोद सातपुते यांचे दु:खद निधन.

❖❖❖❖❖



**पुणे** - येथील आपले समाज बांधव श्री. महेश वसंतराव ढगे यांच्या पत्नी सौ. राजश्री महेश ढगे यांचे रविवार दिनांक १३/०५/२०२४ रोजी आकस्मिक दुःखद निधन झाले.

❖❖❖❖❖

**अमळनेर** श्री हिरामण गजानन साळी-अहिरराव (आप्पा) हल्ली मुक्काम नाशिक यांचे आज दि.१६/०५/२०२४ रोजी पहाटे ०४.३० वाजता वृद्धापकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी नाशिक येथे दुःखद निधन आहे.



❖❖❖❖❖

**नंदूरबार** : कै. चंद्रकांत बन्सीलाल बोरसे, यांचे दि.१७/०५/२०२४ यांचे दुःखद निधन झाले.

❖❖❖❖❖



**घाटकोपर** : दिगंबर धोंडीबा कणस, वय ६५ वर्षे, रा. मुंबई यांचे आज दि. १७/०५/२०२४ रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झालेले आहे.



**बदलापूर :** माझे वडील 'प्रकाश माच्छिंद्र दबडे' यांचे दि.२२/०५/२०२४ रोजी निधन.



**मुलुंड :** कै. सौ. अलका रामचंद्र घटे यांचे दिनांक ९ जुन २०२४ रोजी रात्री ११.१५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

**छत्रपती संभाजी नगर :** कै. जयवंताबाई गोरक्षनाथ कळंके यांचे दि.३ मे २०२४ रोजी ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.



**शिरसोली जळगाव :** गं.भा.शांताबाई फुलचंद नाशिककर यांचे वयाच्या १०६व्या वर्षी दि.२४ मे २०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

**तळोदा :** कै. शरद जंगू लांबोळे यांचे दिनांक २५-५-२०२४ १.३० वाजता दुःखद निधन झाले.

**सुरत :** कै. रंजना रविंद्र धमके हे दिनांक ३० ५ २०२४ यांचे दि.३०/५/२०२४ रोजी निधन झाले.



**कल्याण :** कै. रत्नाकर वसंतराव दळवी यांचे दि.१/६/२०२४ रोजी निधन झाले.



**फैजपूर :** कै. सुरेखा विजय वैद्य यांचे दि. ०४/०६/२०२४ रोजी देवाज्ञा झाली.



**इचलकरंजी :** कै. श्री. ज्योतिर्लिंग अंबादास बारगजे यांचे वयाच्या ८०व्या वर्षी दि.४/६/२०२४ रोजी निधन झाले.



कै. महादेव बाळा दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ
श्री. सदानंद महादेव दुर्गुळे व सौ. शारदा सदानंद दुर्गुळे, भिवंडी यांच्या सौजन्याने पृष्ठदान.



**सुरत :** कै. गं.भा. सुरेखा रघुनाथ खेडकर यांचे दु:खद निधन झाले.



**पिंपरी चिंचवड :** कै. चि. अनिकेत अनिल भंडारे यांचे दिनांक ०८ जून २०२४ रोजी वयाच्या २७ व्या वर्षी आकस्मिक दुःखद निधन झाले.



**सुरत :** कै. चि. रोहन राहुल कुऱ्हे याचे दि.३१/०५/२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



**डोंबिवली :** कै. अरविंद रघुनाथ पीठे यांचे दि.३०/०४/२०२४ रोजी निधन झाले.



**छत्रपती संभाजी नगर :** कै. रमाकांत सुकलाल साळी यांचे वयाच्या ६३व्या वर्षी दि.२७/०५/२०२४ रोजी निधन झाले.



**परतूर (जालना) :** कै. जयलक्ष्मी त्र्यंबकराव माटोले यांचे ता. २७ मे २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



**डोंबिवली :** कै. प्रतिभा प्रकाश आत्रे यांचे ६१व्या वर्षी दि. २१ जुन २०२४ रोजी निधन झाले.

## धोक्याचा इशारा

अजुनही वेळ गेलेली नाही. आज आपण जागे नाही झालो तर येणारा काळ आपल्यासह आपल्यां भावी पिढीला विनाशाच्या दिशेने घेऊन गेल्याशिवाय राहाणार नाही. निसर्गाचा तोल ढासळतोय. ' हळूहळू निसर्गाने आपले उग्र रूप दाखवायला सुरवात केली आहे.' जंगलेच्या-जंगले नष्ट केली गेली आहेत,एकरोगणती जिवंत झाडे तोडून मोठमोठाले कॉम्प्लेक्स बांधले जात आहेत मात्र त्या तुलनेत झाडे लावली जात नाहीत. समुद्राच्या खाड्याच्या-खाड्या बुजवल्या गेल्या आहेत. निसर्गाला आव्हान देऊन मानव आपल्यां स्वार्थासाठी कॉंक्रिटची जंगलेच्या-जंगले उभे करीत आहे. निसर्गाचे बदलत असलेले रूप कसे बदलत चालले आहे यांचे अत्यंत बारकाईने निरक्षण करून मानवाने आपले स्वार्थी रूप बदलुन निसर्गाला आपले दैवत मानुन त्यांची मनोभावे सेवा करून त्यांचे संगोपन करणे हाच एक मार्ग ह्या धरणीमातेला पर्यायाने मानवजातीला वाचविण्या करिता आहे. प्रत्येकाने झाडे लावा, झाडे जगवा, पाणी आडवा आणि पाणी जिरवा हे व्रत अंगीकारून जर तातडीने पाऊले उचलली तर आणि तरच आपण निसर्गाचा होऊ घातलेला कोप थांबविण्याचा यशस्वी प्रयत्न करू शकतो. चला आपले त्याचबरोबर धरणीमातेचे रक्षण करण्याकरिता अंग झटकून-वेड्याचे घेतलेले सोंग सोडुन महान कार्याला लागु या.

भगवान श्रीं जिव्हेश्वर, श्रीं स्वामी समर्थ

***सदैव आपलेच***

***श्रीं. व सौ. अश्विनी भरत मते.***





कै. सौ. वंदना विनायक भागवत यांच्या स्मरणार्थ
श्री. विनायक नामदेव भागवत, डोंबिवली यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

**चि. कृष्णादित** | **चि. श्रीविक** | **चि. प्रिश व कु. वन्या**







४ जुन - ६वा वाढदिवस
श्री. डॉ. तुषार व
सौ. डॉ. चारुशिला कासटकर
यांचे चिरंजीव

श्री. सागर व
सौ. प्रियंका कासटकर
यांचे चिरंजीव

श्री. विशाल व सौ. डॉ. प्रिती कासटकर
यांचे सुपुत्र
आजोबा श्री. सोमनाथ कासटकर
आजी सौ. शैलजा कासटकर
यांच्यासह....

**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचारतर्फे शुभेच्छा !**

## प्रथम वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!







-: शुभेच्छूक :-

**सौ. ज्योत्स्ना प्रभाकर कापरे (आजी-आजोबा), सौ. हर्षनी प्रथमेश कापरे (आई-वडील)**
**सौ. मंगला वसंत कापरे (आजी-आजोबा), चि. अंकुश (काका) व चि. अजिंक्य (मामा)**
**श्रीमती वैशाली बागुल (आजी) आणि सर्व समाज बांधवांना कडून खुप शुभेच्छा शुभ आशीर्वाद !**

कै. श्रीमती लीलावती काशिनाथ साळी (डरंगे) व कै. काशिनाथ म. साळी यांच्या स्मरणार्थ
श्री. प्रकाश काशिनाथ साळी (डरंगे) रा. नाशिक यांच्या सौजन्याने पृष्ठदान

Swakul Samachar published and posted on
2nd date of every month at BPC Kalyan

Postel Reg. No. THC/144/2023-2025
WPP License No. NMR/Tech/WPP-02/TC/2023 (Upto Dec.)



# भावपूर्ण श्रद्धांजली



## कै. श्री. रत्नाकर वसंतराव दळवी

जन्म १४-९-१९५० मृत्यू १-६-२०२४

तो शांत हसरा चेहरा, नाही कुणाला दुखावले, मनाचा तो भोळेपणा, नाही केला मोठेपणा,
सोडुनी गेला अचानक, नव्हती कुणाला याची जाण, पुन्हा परतुनी यावे, हीच आमची अपेक्षा...

श्रीमती प्रतिभा रत्नाकर दळवी (अध्यक्षा, स्वकुळ साळी समाज, कल्याण)
श्री. नरेंद्र वसंतराव दळवी
श्री. प्रसाद वसंतराव दळवी
श्रीमती संजीवनी गोविंद एडके, कल्याण (बहीण)
श्री. व सौ. अंजली सुरेश बावणे, इचलकरंजी (बहीण)
शोकाकुल दळवी परीवार

**स्वकुळ समाचार पृष्ठदानाचे सन्माननीय हितचिंतक**

१) श्रीमती व्दारकाबाई प्रल्हाद साळी, बदलापूर मो. ९८५०५१२७१७
२) श्री. किरण पांडुरंग काटकर, मुलुंड मो. ९८३३२८९१५२
३) श्री. समीर शशीकांत अंबुर्ले, विरार मो. ९०९६५९८५६९
४) सौ. महानंदा कमलाकर हर्णेकर, मुलुंड मो. ९९६९२७८५५०

If undelivered please return to:

**JULY 2024** **Swakul Samachar**

Editor- Mr. Gopal S. Thorat
Room No.5177, Gharkul Hsg. Soc.,
Near Maruti Temple, Shivaji Nagar,
Ambarnath (East) 421501

या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक सहमत असतातच असे नाही .... संपादक

To,

Printer & Publisher Mr. Barsu R. Sitafale on behalf of Thane Jillah Swakul Sali Samaj Printed at Laxmi Printers, 4. Mohini Soc., Anand Nagar, Dombivli (W) Dist. Thane - 421 202 Published at:B/303, Rutuvrat Co-op.Hsg.Soc.,Anand Nagar, Dindayal Rd., Near Indrayani Hospital, Dombivali (W), Dist. Thane-421 202
Editor :- Mr. Gopal S. Thorat RNI No. MAHMAR/2014/57230